बुधवार, २२ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १५५
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

योगसाधक पु. ल. भारद्वाज यांचे देहावसान

पनवेल : पनवेल आरोग्य सेवा समितीचे (योग केंद्र) संस्थापक संचालक पु. ल. भारद्वाज उर्फ बाबा यांचे मंगळवारी (दि. २१) संध्याकाळी आठच्या सुमारास अल्पशा आजाराने देहावसान झाले. ते ९६ वर्षांचे होते. योग आणि आयुर्वेदाद्वारे पनवेलकरांना आरोग्याचे महत्त्व पटवून देणारे भारद्वाज यांचे निधन झाल्याने आमदार प्रशांत ठाकूर यांनी शोक व्यक्त केला आहे. मुंबईतील योग विद्या निकेतनमध्ये प्रशिक्षण घेऊन निवृत्तीनंतरही आराम न करता भारद्वाज यांनी सन १९८९मध्ये पनवेल येथे योगकेंद्राची मुहूर्तमेढ रोवली. योग आणि आरोग्याला वाहिलेले योगसखा मासिक या योगकेंद्रातर्फे गेली १८ वर्षे त्यांनी सातत्याने प्रकाशित केले. भारद्वाज यांची अंत्ययात्रा बुधवारी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानाहून निघणार आहे.

अंतरंग

आमदार रवींद्र वायकरांची ईडीकडून चौकशी/२
पेणमध्ये नो व्हेइकल डे उपक्रमाचा शुभारंभ/४
प्रो-कबड्डी लीगचा आजपासून थरार/६

आजपासून राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन

सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी विरोधक सज्ज

मुंबई : प्रतिनिधी

राज्याच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन बुधवार (दि. २२)पासून सुरू होत आहे. ओबीसी आरक्षण, पेपरफुटी, परीक्षेतील विलंब, एसटी संप, मराठा आरक्षण, शेतकरी प्रश्न अशा विविध मुद्द्यांवर बॅकफूटवर असलेल्या महाविकास आघाडीसाठी हे अधिवेशन कसोटीचे ठरणार आहे. विरोधी पक्ष भाजपने अधिवेशनात आक्रमक होण्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील ज्वलंत प्रश्नांवर भाजप विरुद्ध आघाडी सरकार असा सामना रंगण्याची चिन्हे आहेत.

कोरोना प्रादुर्भावाचे कारण देत सलग दुसऱ्या वर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरऐवजी मुंबईत होत आहे. या पाच दिवसांच्या अधिवेशनात आघाडी सरकारला घेरण्यासाठी भाजपकडे अनेक

हिवाळी अधिवेशन

मुद्दे आहेत. त्यामुळे हिवाळी अधिवेशन तापणार असून भाजपच्या हल्ल्याला तोंड देणे आघाडीसाठी आव्हानात्मक ठरेल. विशेषत्वाने ओबीसी आरक्षण, शासकीय भरतीच्या परीक्षा घेण्यात आलेले अपयश, एसटीचा चिघळलेला संप आदी मुद्द्यांवरून अधिवेशन वादळी ठरण्याची दाट शक्यता आहे.

यंदाचे हिवाळी अधिवेशन २२ ते २८ डिसेंबर या कालावधीत होणार आहे. कार्यकाळ जरी सात दिवसांचा वाटत असला तरी शनिवार आणि रविवारमुळे हे अधिवेशन अवघ्या पाचच दिवसांचे असणार आहे. सध्या विविध मुद्द्यांवरून राज्य सरकार विरुद्ध विरोधक असा जोरदार सामना सुरू आहे. अशातच आता पुन्हा एकदा सभागृहात ठाकरे आणि फडणवीस आमने-सामने येणार आहेत. फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन आधीच सरकारवर हल्लाबोल केला असून सभागृहात त्यांना तोंड देणे सत्ताधाऱ्यांना कठीण जाणार असल्याचे दिसते.

सातारा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर भवनाचे शरद पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज प्रांगणात उभारण्यात आलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर भवनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा सोहळा येत्या सोमवारी (दि. २७) सकाळी ११ वाजता होणार आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगिरथ शिंदे, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील तसेच संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही स्वतःची शैक्षणिक संस्था असली तरी त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर जीवापाड प्रेम आहे. रयत संस्थेला मातृसंस्था मानून ते कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेला जेव्हा-जेव्हा

येत्या सोमवारी सोहळा

गरज पडली तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर मदतीला धावून आले. 'रयत'च्या विकासात त्यांचा मोलाचा वाटा आहे हे सर्वश्रुत आहे.

चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात. याच सुनीतीतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीय सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत आहेत. रयत आणि ठाकूर कुटुंबीय यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम रयतसेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर सदैव करीत असतात.

रयत शिक्षण संस्थेच्या विकासात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. मानवता सेवा आणि स्वावलंबनाचे बाळकडू सातारा येथील शिवाजी कॉलेज येथे शिकताना कमवा आणि शिका या योजनेत त्यांना मिळाले होते. त्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. 'रयत'च्या सेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे भव्य भवन उभारण्यात आले आहे. या सोहळ्यास रयतप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी केले आहे.

राज्य सरकारकडून लोकशाही कुलूपबंद -देवेंद्र फडणवीस

मुंबई : सरकारी चहापानावर बहिष्कार टाकत अधिवेशनात राज्य सरकारला विविध मुद्द्यांवर घेरण्याची तयारी विरोधकांनी केली असून त्याचीच प्रचिती अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपने घेतलेल्या पत्रकार परिषदेत आली. या वेळी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीला कुलूपबंद करण्याचा प्रयत्न या सरकारकडून सुरू असल्याचे म्हणत टीकास्त्र सोडले.

फडणवीस म्हणाले की, या सरकारच्या परंपरेप्रमाणे जितकी लहानात लहान अधिवेशने घेता येतील, जेवढ्या जास्तीत जास्त चर्चा टाळता येतील आणि जेवढी लोकशाही कुलूपबंद करता येईल तेवढी करण्याचा प्रयत्न या छोट्याशा अधिवेशनातून केला जात आहे. संसदेचे, अनेक राज्यांचे अधिवेशन फार काळ चालू शकते, पण महाराष्ट्रात अधिवेशन घेण्याची

मानसिकताच या सरकारची नाही. या सरकारने लोकशाही बंद केली आहे. त्यांची रोकशाही आणि रोखशाही चालू आहे.

भ्रष्टाचाराने बरबटलेला कारभार राज्याच्या जनतेने कधीही पाहिला नाही. स्थगिती, खंडणी, वसुली, लूट, भ्रष्टाचार याचे जेवढे प्रकार सध्याच्या सरकारच्या काळात पाहायला मिळताहेत तेवढे कधीच पाहायला मिळाले नाहीत, अशा शब्दांत फडणवीसांनी राज्य सरकारवर निशाणा साधला.

विरोधकांनी बोलू नये तसेच त्यांची तोंडे बंद करण्यासाठी एकेक वर्षासाठी आमदारांना निलंबित करून राज्याच्या इतिहासाला अक्षरशः काळीमा फासण्याचे काम सरकारच्या दबावाखाली होत आहे. ज्या घटना घडल्या नाहीत त्यांची कारणे सांगून आमच्या आमदारांना निलंबित केले आहे. वर्षभरासाठी निलंबित करण्याचे एवढेच कारण आहे की, आपल्या स्वतःच्या आमदारांवर सरकारला विश्वास नाही. सरकार कधीही अडचणीत येऊ शकते असा ठाम विश्वास यांच्या मनात आहे. म्हणून मुद्दाम आमची संख्या कमी करण्याचा कार्यक्रम सरकारने केला आहे, असेही फडणवीस म्हणाले.

राज्य सरकारला १७० आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा पोकळ असल्याचे फडणवीस यांनी म्हटले. पेपरमध्ये वाचायला मिळाले की, या अधिवेशनात अध्यक्षांची निवड होणार आहे. १२ आमदार बाहेर ठेवून अध्यक्षांची निवडणूक घ्यायची म्हणजे सरकार किती असुरक्षित आहे. राज्याच्या स्थापनेपासून आजपर्यंत अध्यक्षांची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झालेली असताना नियमबाह्य पद्धतीने अध्यक्षांची निवडणूक घेण्याचा घाट घातला जातोय. १७० आमदारांचा पाठिंबा असल्याचे हे सांगत होते. तो किती पोकळ आहे हे यातून लक्षात आले, अशी खिल्ली त्यांनी उडवली.

निवडक

तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन निलंबित

नवी दिल्ली : अध्यक्षांच्या दिशेने राज्यसभेची नियमावली पुस्तिका फेकून मारल्याने तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेन ओब्रायन यांना मंगळवारी (दि. २१) निलंबित करण्यात आले. सुधारित निवडणूक कायदा विधेयकाबाबत चर्चा केली जात असताना त्यांनी हे कृत्य केले. त्यामुळे या अधिवेशनाच्या उर्वरित कामकाजात त्यांना सहभागी होता येणार नाही.

पंजाब काँग्रेसला धक्का; आमदाराचा भाजपत प्रवेश

चंदिगड : पंजाब विधानसभा निवडणुकीच्या आधी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. गुरु हर सहाय मतदारसंघातील आमदार आणि माजी मंत्री राणा गुरमीत सिंह सोधी यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत आणि भूपेंद्र यादव यांच्या उपस्थितीत भाजपचे सदस्यत्व स्वीकारले. ते पक्षात नाराज होते.

टीईटी पेपरफुटी प्रकरण

आणखी दोघे अटकेत; उमेदवारांचे निकाल बदलले

पुणे : प्रतिनिधी

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) गैरव्यवहारप्रकरणी पोलिसांनी आणखी दोघांना अटक केली आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष सुखरेदव ढेरे आणि जीए टेक्नॉलॉजीचा प्रमुख अश्विन कुमार यांचा समावेश आहे. त्यांनी तब्बल ५०० उमेदवारांचे निकाल बदलल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

टीईटीसह म्हाडा आणि सैन्य भरतीच्या परीक्षेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणात मोठे रॅकेट असल्याचे समोर येत आहे. टीईटी गैरव्यवहारप्रकरणी यापूर्वी पोलिसांनी परीक्षा परिषदेचे आयुक्त तुकाराम सुपे यांना अटक केली होती. त्यांच्याकडून सुरुवातीला ९० लाखांचे, तर नंतर दोन कोटींचे घबाड पोलिसांनी जप्त केले आहे.

या प्रकरणी आणखी दोघांना अटक केल्याची माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी दिली. यातील सुखरेदव ढेरे यांना संगमनेर येथून, तर अश्विन कुमार यांना बंगळुरूमधून ताब्यात घेतले आहे. आरोपींनी तब्बल ५०० उमेदवारांचे निकाल बदलले असून त्यासाठी पाच कोटींची उलाढाल झाल्याचा अंदाज आहे. आरोपींवर उमेदवारांचे निकाल बदलणे, प्रश्नपत्रिकेत फेरफार करणे, पास केलेल्या उमेदवारांना खोटी प्रमाणपत्रे देणे असे आरोप आहेत.

तंत्रज्ञानाचा वापर करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

■ महात्मा फुले महाविद्यालयात टॅली प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिर

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार संस्थेतील प्रत्येक सेवकाने आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून त्याचा योग्य वापर प्रशासनामध्ये केला पाहिजे. आज आपणा सर्वांना अपेक्षित परिवर्तनाची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला बदलले पाहिजे तरच आपली व देशाची प्रगती होऊ शकते, कारण परिवर्तन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २१) येथे केले.

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात संस्थेच्या रायगड विभागाच्या संयुक्त विद्यमाने टॅली प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविक करीत प्रशिक्षणाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. अत्याधुनिक तंत्रज्ञान येऊ घातले असताना संस्थेतील सेवक हा प्रशिक्षित झाला पाहिजे यासाठी या शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य एम. बी. शेख, ओएसडी शहाजी डोंगरे, विभागीय सहाय्यक अधिकारी एस. एस. फडतरे, आर. पी. ठाकूर यांच्यासह रायगड विभागातील विविध शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आदी उपस्थित होते. रोहिदास ठाकूर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

महाविकास आघाडी सरकार, कायद्यानं बोला!

प्रशांत ठाकूर
(आमदार, पनवेल विधानसभा)

विधिमंडळ अधिवेशन जवळ आले की आमदारांना आमचा विषय सभागृहात मांडा असे सांगणारे रोज कोणीतरी भेटतेच. पत्रकार विचारतात की या अधिवेशनात तुम्ही कोणता विषय मांडणार? या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला माझ्या भावना...

हिवाळी अधिवेशन

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन २२ डिसेंबरपासून सुरू होत आहे, परंतु मागील दोन वर्षांतील विधिमंडळ अधिवेशनाच्या कामकाजाचा अनुभव पाहता महाविकास आघाडी सरकार हे अधिवेशनदेखील केवळ औपचारिकपणे रेटून नेईल असेच वाटत आहे, कारण राज्यात अनेक महत्त्वाचे विषय प्रलंबित असताना केवळ सात दिवसांचे (शनिवार व रविवार अशा दोन सुट्या वगळून पाचच दिवसांचे) अधिवेशन घेण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतला आहे, जो राज्यातील एकूण परिस्थिती पाहता दुर्दैवी आहे.

२०१९ साली महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून महाराष्ट्रातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, तर काही प्रश्न नव्याने निर्माण करण्याचे काम या आघाडी सरकारने केले आहे. ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाचा प्रश्न, राज्यातील एसटी कामगारांचे प्रश्न, मराठा आरक्षणाचा प्रश्न, शेतकरी-कष्टकऱ्यांचे प्रश्न, महापूर व चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मिळणाऱ्या भरपाईतील दिरंगाई, विविध परीक्षांमधील घोटाळा, वाढलेला भ्रष्टाचार, मच्छीमार बांधवांचे प्रश्न, राज्यातील बिघडलेली कायदा सुव्यवस्था असे अनेक प्रश्न प्रलंबित असताना अधिवेशनापासून पळ काढण्यासाठी महाविकास आघाडी सरकारकडून कमी कालावधीचे अधिवेशन घेण्यात येत आहे. पाच दिवसांच्या अधिवेशनातदेखील कोविड नियमांच्या नावाखाली आमदारांच्या प्रश्न विचारण्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणण्याचे काम राज्य सरकार करत असल्याचे कार्यक्रम पत्रिकेतून दिसून येते.

महाराष्ट्राच्या विधानसभेला एक सुसंस्कृत परंपरा आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपासून अनेक दिग्गज नेत्यांनी सभागृहाचे पावित्र्य जपलेले आहे. चुकीच्या गोष्टीला विरोध आणि चांगल्या कामाचे कौतुक करून राज्यातील जनतेचे हित कसे जोपासता येईल, त्यावर सभागृहात चर्चा करून प्रश्नांचे निरसन कशा प्रकारे करता येईल असे संविधानिक काम महाराष्ट्र विधिमंडळाने आजवर केले आहे. या ठिकाणी मा. यशवंतराव चव्हाण, मा. शंकरराव चव्हाण, मा. शरद पवार, मा. विलासराव देशमुख, मा. एन. डी. पाटील, मा. दत्ता पाटील, मा. दि. बा. पाटील तसेच मा. गोपीनाथ मुंडे साहेब यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी सभागृहात अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा करून राज्याचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. **(पान २ वर..)**

दहावी, बारावी परीक्षांचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर

पुणे : प्रतिनिधी

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या पुढील वर्षीच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी ट्विट करून या संदर्भात माहिती दिली.

बोर्डाकडून यापूर्वी परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या होत्या. बारावीची लेखी परीक्षा ४ ते २२ मार्चदरम्यान, तर दहावीची परीक्षा १५ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत होणार आहे. आता बोर्डाकडून परीक्षेचे प्रत्येक विषयानुसार सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून संपूर्ण वेळापत्रक बोर्डाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत वेबसाईटवर ते उपलब्ध आहे.

नगरपंचायत निवडणुकीसाठी रायगडात शांततेत मतदान

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींमध्ये मंगळवारी (दि. २१) शांततेत मतदान झाले. कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. २३४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदानयंत्रात बंद झाले असून मतमोजणी १९ जानेवारी रोजी केली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांना निकालासाठी महिनाभर प्रतीक्षा करावी लागणार आहे.

रायगड जिल्ह्यात माणगाव, म्हसळा, तळा, पोलादपूर, पाली व खालापूर या सहा नगरपंचायतींमधील एकूण ७९ जागांसाठी मंगळवारी मतदान घेण्यात आले. किरकोळ प्रकार वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. सकाळपासूनच मतदानासाठी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ७४.२० टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. दरम्यान, ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठीही मतदान झाले. याची मतमोजणी व निकाल बुधवारी (दि. २२) आहे.

शिवसेनेच्या रवींद्र वायकरांची ईडीकडून चौकशी

मुंबई : प्रतिनिधी

शिवसेना आमदार रवींद्र वायकर यांची आठ तास सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) चौकशी करण्यात आली आहे. तब्बल आठ तास रवींद्र वायकर ईडीच्या प्रश्नांना सामोरे गेले. नेमक्या कोणत्या प्रकरणी त्यांनी ईडीने चौकशीसाठी बोलावले होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये त्यांची चौकशी करण्यात आली असल्याचे म्हटले जात आहे.

रवींद्र वायकर हे मंगळवारी (दि. २१) दुपारच्या सुमारास ईडी कार्यालयात हजर झाले होते. त्यानंतर तब्बल आठ तास त्यांची ईडी कार्यालयात कसून चौकशी करण्यात आली. आठ तास शिवसेना आमदार रवींद्र वायकर हे ईडीच्या प्रश्नांना सामोरे गेले. त्यांना नेमके कोणत्याप्रकरणी ईडीने चौकशीसाठी बोलावले होते, याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळू शकलेली नाही. वेगवेगळ्या प्रकरणांच्या अनुशंगाने ईडीने रवींद्र वायकर यांना चौकशीसाठी समन्स बजावले असल्याचे कळतेय. त्यानुसार रवींद्र वायकर हे चौकशीसाठी हजर झाले होते. आज झालेल्या या चौकशीतून आता नेमके काय बाबी समोर आल्यात, हे लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

▪ चौकशीपूर्वी गुप्तता; तर्कवितर्कांना उधाण

रवींद्र वायकर हे माजी मंत्री होते. गेल्या सरकारमध्ये त्यांना मंत्रिपद देण्यात आले होते. रवींद्र वायकर हे मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या जवळचे म्हणून ओळखले जातात. त्याच्या ईडी चौकशीचे नेमके कारण काय होते, यावरून तर्कवितर्कांना उधाण आलेय, मात्र अद्यात या चौकशीबाबत कमालीची गुप्तता बाळगण्यात आली असून कोणत्याप्रकरणी रवींद्र वायकर हे ईडी कार्यालयात चौकशीसाठी गेले होते, हे कळू शकलेले नाही.

निवडक

पोस्टल एम्प्लॉईज युनियनचे अधिवेशन

आळंदी : राष्ट्रीय मजदुर काँग्रेस (इंटक) या राष्ट्रीय संघटनेबरोबर संलग्न असलेली नॅशनल युनियन ऑफ पोस्टल एम्प्लॉईजचे २२वे राष्ट्रीय व महाराष्ट्र गोवा सर्कलचे २६वे अधिवेशन इंटकचे राष्ट्रीय सचिव महेंद्र घरत यांच्या अध्यक्षतेखाली श्रीक्षेत्र आळंदी येथे झाले. कोरोना काळात पोस्टल कर्मचाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता आपले कर्तव्य बजावले. अतिशय दुर्गम भागात जेथे रस्ते, इंटरनेटची सुविधा नाही अश्या दुर्गम भागात पोस्ट कर्मचारी पोहचून नागरिकांना शहराशी जोडून ठेवण्याचे काम करत असतात अशा कर्मचाऱ्यांचे महेंद्र घरत यांनी अभिनंदन केले. या अधिवेशनासाठी देशभरातून ८०० कर्मचारी उपस्थित होते. विविध राज्यातून आलेल्या सन्माननीय व्यक्तींचा महेंद्र घरत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

विधी सल्लागार पुरवठा संस्थांना आवाहन

नवी मुंबई : कोकण विभागीय आयुक्त कार्यालयासाठी विधी सल्लागार हे पद बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याकरीता दरपत्रक मागविण्यात आले आहे. कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाच्या विकास-आस्थापना शाखेकरीता बाह्यस्त्रोताद्वारे विधी सल्लागार हे पद भरण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या पात्र संस्था, ठेकेदार, बाह्ययंत्रणा, कंपनी यांच्याकडून दरपत्रके मागविण्यासाठी http://divcomkonkan.gov.in या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. इच्छुक संस्थांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनांनुसार दरपत्रक सादर करावे, असे आवाहन कोकण विभागीय महसूल आयुक्त विलास पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

सनातन संस्थेतर्फे ग्रंथप्रदर्शन

पनवेल : सनातन संस्थेच्या वतीने दत्त जयंतीच्या निमित्ताने रायगड पालघर जिल्ह्यात एकूण १७ ठिकाणी विविध दत्त मंदिरांजवळ ग्रंथप्रदर्शने लावून अध्यात्मप्रसार करण्यात आला. या सर्व ग्रंथप्रदर्शनांना भेट देणारे भाविक आणि जिज्ञासूंचा उत्तम प्रतिसाद लाभला. रायगड जिल्ह्यात पनवेल, कळंबोली, पेण, उरण, महाड, नागोठणे, खोपोली येथे सनातन संस्थेच्या वतीने ही ग्रंथप्रदर्शने लावण्यात आली. दत्तजयंतीच्या पार्श्वभूमीवर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासूनच दत्त उपासनेचे शास्त्र जिज्ञासूंना कळावे यासाठी ऑनलाइन आणि जिज्ञांसूच्या मागणीनुसार प्रत्यक्ष ठिकाणी व्याख्याने, सामूहिक नामजप, फलक प्रसिध्दी, सोशल मिडीया आदी माध्यमातूनही लोकांचे प्रबोधन करण्यात आले.

अटलजींच्या जयंती दिनी भाजपतर्फे विविध कार्यक्रम

नवी मुंबई : बातमीदार

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनी २५ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षातर्फे सुशासन दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने राज्यभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहे. नवी मुंबईतदेखील अनेक कार्यक्रम होणार आहेत. यात मोदी सरकारच्या सात वर्षांतील कामगिरीची माहिती देणारी व्याख्याने, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान, ई श्रम कार्ड वितरण असे विविध कार्यक्रम होणार आहेत. भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांनी ही माहिती दिली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या उपस्थितीत मुंबईत अटलजींच्या पुतळ्याचे अनावरण होणार असल्याचेही रामचंद्र घरत यांनी म्हंटले आहे. 'अटलजी ते मोदीजी – सुशासनाचा प्रयास' या विषयावर विविध क्षेत्रातील नामवंतांची व्याख्याने होणार आहेत. तसेच वकील , डॉक्टर, चार्टर्ड अकाऊंटंट, प्राध्यापक, उद्योजक अशा मंडळींचे मेळावे आयोजित करून मोदी सरकारने घेतलेले जनहिताचे निर्णय, सुशासन संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी टाकलेली पावले याची माहिती दिली जाणार आहे.

गेल्या सात वर्षांत मोदी सरकारने शेतकरी व अन्य समाजघटकांच्या कल्याणासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती देणारी पत्रके बूथ स्तरापर्यंत वितरीत केली जाणार आहेत. या खेरीज सर्व बुथवर अटलजींच्या प्रतिमेला अभिवादन, जनसंघापासून काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान, अटलजींच्या कवितांचे जाहीर वाचन, महाविद्यालय परिसरात अटलजींच्या जीवनावर निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा असे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये सुशासनाची कल्पना राबविण्यासाठी उपक्रम राबविणाऱ्या भाजप लोकप्रतिनिधींचा 'अटल पुरस्कार' देऊन गौरव केला जाणार आहे.

असंघटीत कामगारांसाठी मोदी सरकारने सुरू केलेल्या ई श्रम कार्ड योजनेची माहिती देऊन संबंधितांना ई श्रम कार्डचे वितरण करणे आदी कार्यक्रमही होणार आहेत, असेही रामचंद्र घरत यांनी पत्रकात नमूद केले आहे.

भाजपच्या ई-श्रम कार्ड शिबिराला प्रतिसाद

नवी मुंबई : बातमीदार

भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे नवी मुंबई अध्यक्ष राजेश राय यांनी ई-श्रम कार्ड शिबिराचे आयोजन सानपाडा येथे केले होते. जवळपास ५० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत कार्ड काढून घेतले.

मोदी सरकारने असंघटित कामगारांच्या सुरक्षेसाठी आणलेल्या ई-श्रम कार्ड योजनेविषयी या वेळी जागृती करण्यात आली व माहिती देण्यात आली. यापुढेदेखील ई-श्रम कार्ड शिबिर आयोजित करण्यात येईल, असे राजेश राय यांनी सांगितले.

या वेळी उत्तर भारतीय मोर्चा सचिव दीपा शाह, रजनी लखोटिया, उपाध्यक्ष अजय सिंह, अतुल सरोज, विजय सिंह, अरविंद उपाध्याय, विकास निकम, रमेश दुबे, अनिल सिंह, वीरेंद्र जायसवाल, संतोष गुप्ता आदी उपस्थित होते.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २२ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

- ६. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ७. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ८. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ९. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १०. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- ११. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १२. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १३. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

- १. काळण समाज हॉल, पनवेल
- २. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

पनवेल ग्रामीण लसीकरण

- वळवली रा.जि.प. शाळा
- रोहिंजण रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- पाले खुर्द रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- आसुडगाव रा.जि.प. शाळा
- जुई रा.जि.प. शाळा

पान १ वरून

महाविकास आघाडी सरकार, कायद्यानं बोला!

मा. देवेंद्रजींनी सभागृहातील कोणत्याही चर्चेला आत्मविश्वासाने सामोरे जात नवे मापदंड प्रस्थापित केले, पण मागील दोन वर्षांत आघाडी सरकारच्या मनमानी कारभारामुळे हिवाळी अधिवेशन नागपूरमध्ये होऊ शकलेले नाही. त्यातच मुंबईत झालेले मागील पावसाळी अधिवेशन विधानसभेच्या अध्यक्षांविनाच पार पडले. यंदा होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या वेळी विधानसभा अध्यक्षांची निवड होणार असेल, तर त्याकरिता नियमांत बदल करून आवाजी मतदानाने निवड करण्याचा नियम आघाडी सरकारने केला. सरकारला हा नियम करण्याची गरज का भासली? सत्ताधारी आमदार फुटण्याची भीती राज्य सरकारला वाटत आहे का? किंवा स्वतःच्या आमदारांवर यांचा विश्वास नाही का? असे असंख्य प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात तसेच विधानसभा अध्यक्षांच्या निवडीसाठी नियमात बदल करण्याची तत्परता जेवढ्या घाईने करण्यात आली तेवढीच तत्परता ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाबाबत दाखवावी असे सरकारला का वाटले नाही? खरंतर यांच्या करणी आणि कथनीमध्ये खूप मोठा फरक आहे. आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे आणि केवळ केंद्र सरकारकडे बोट दाखविण्याच्या वृत्तीमुळे राज्यात अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी समाजावर अन्याय होणार आहे. त्यांचे लोकप्रतिनिधीत्व कमी होणार आहे, पण याची 'जबाबदारी' घेण्यास राज्य सरकारमधील एकही मंत्री तयार नाही. त्यामुळेच महाविकास आघाडी सरकार म्हणजे ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाचे मारेकरी अशीच नोंद महाराष्ट्राच्या इतिहासात होणार आहे.

राज्यात अनेक परीक्षांमध्ये घोटाळा करणारे रॅकेट उघडकीस येत आहेत. आरोग्य भरती, म्हाडा, टीईटी, पोलीस भरती परीक्षेत झालेले घोटाळे आणि विद्यार्थ्यांची होणारी छळवणूक दुर्दैवी आहे. कुठेतरी कुंपणच शेत खात असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली असताना आणि विधानभवनात या विषयावर चर्चा होणे अपेक्षित असताना महाविकास आघाडी सरकार मात्र चालढकलपणा करत आहे. मागील दोन वर्षांत राज्यातील सहकार क्षेत्राची वाताहत झाली असून शेतकरीदेखील हवालदिल आहेत. एसटी कर्मचारी दीड महिन्यांपासून संपावर असल्याने ग्रामीण महाराष्ट्राची वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. खाजगी वाहतूक करणारे प्रवाशांची लूट करत आहेत. महाराष्ट्राचे पर्यटन धोरण योग्य पद्धतीने अमलात न आल्याने पर्यटन व्यवसायाला घरघर लागलेली आहे. कोविड लसीकरणाला गती देण्याची आवश्यकता असून राज्य सरकारने आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्रात एवढे प्रश्न प्रलंबित असताना राज्याला कोणीही वाली नाही. मुख्यमंत्र्यांवर शस्त्रक्रिया झाल्याने ते आराम करत आहेत. उपमुख्यमंत्री पुण्यात व्यस्त आहेत. इतर मंत्र्यांचे तर न विचारलेलेच बरे! त्यामुळे एकूणच महाराष्ट्रात राज्य सरकार म्हणावे अशी कुठलीही यंत्रणा दिसून येत नाही. सत्ताधारी मंत्र्यांची कार्यक्षमता दिसून येत नाही. पालकमंत्र्यांचे काम दिसून येत नाही. कॅबिनेट बैठकीत कुठलाही ठोस विषय समोर येत नाही. सरकार म्हणून एकूणच अपयशी ठरलेले आघाडी सरकार आता विधानभवनाची परंपरा आणि गरिमा राखण्यातदेखील अपयशी ठरत असल्याने जनतेच्या दरबारात मात्र यांना उत्तरे द्यावी लागतील!

नवी मुंबईत नावारूपास येत असलेल्या लोकनेते स्व. दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाचा विषयही प्रलंबित आहे. आमच्या पनवेल, उरण व नवी मुंबईसह परिसरातील सर्व भूमिपुत्रांच्या अस्मितेचा हा विषय आहे, पण या ठिकाणीदेखील राज्य सरकारचे प्रमुख नेते आडमूठेपणाची भूमिका घेत असल्याचे दिसून येते. लोकनेते दि. बा. पाटील साहेबांचा त्याग आणि राज्यस्तरावर त्यांनी केलेले समाजकार्य पाहता त्यांच्या नावाविषयी कोणताही विवाद उपस्थित होणे अप्रस्तुत आहे, मात्र मी आणि माझे कुटूंब या भूमिकेच्या पलिकडे यायला राज्याचे मुख्यमंत्री तयार नाहीत. नामकरणाच्या विषयावर सभागृहातदेखील चर्चा व्हावी आणि समस्त महाराष्ट्राने लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांच्या विमानतळ नामकरणाविषयी बोलावे हे अभिप्रेत असताना राज्य सरकारकडून मात्र सभागृहाचा वेळ कमी करण्यात येत आहे.

कर्नाळा बँकेच्या संदर्भात प्रचंड घोटाळा समोर आल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने कारवाई केली, मात्र महाराष्ट्राचे गृह खाते विवेक पाटील यांना पदराखाली घेत आहे. फेब्रुवारी २०२०मध्ये केस होऊनदेखील विवेक पाटलांच्या मुला-बहिणीसह सर्व संचालकांना अभयदान देण्यासाठी सर्व स्तरांतून प्रयत्न केले जात आहेत. सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी मागील अधिवेशनात विधानभवनाच्या पायऱ्यांवर येऊन या संदर्भात कारवाई करण्याचे आश्वासन देऊनदेखील या प्रकरणात साध्या क्लार्कलाही अटक झालेली नाही. संचालकांच्या अटकेची तर अपेक्षा करणे दूरच राहिले!

निसर्ग चक्रीवादळामुळे कोकणातील आंबा, सुपारीसह इतर बागांचे प्रचंड नुकसान झाले, परंतु नुकसानग्रस्तांना अद्यापही भरपाई मिळालेली नाही. अतिवृष्टीबाधितांनादेखील नुकसानभरपाई मिळालेली नाही. असे एक ना अनेक विषय आमच्या लोकप्रतिनिधीने विधानभवनात मांडावेत, अशी सामान्य जनता अपेक्षा करते, पण महाविकास आघाडी सरकारला केवळ पळच काढायचा असल्यामुळे विधिमंडळात आमदार म्हणून वापरण्यात येणारी सर्व आयुधे काढून घेण्यात आली आहेत.

एकूणच सरकारी यंत्रणा म्हणून महाविकास आघाडी अपयशी ठरत आहे. अशा वेळी विधिमंडळात चर्चा करून व चर्चेअंती जनतेचे प्रश्न सोडविणे अपेक्षित असताना अधिवेशनाच्या बाबतीत केवळ वेळकाढूपणा करण्याचे काम महाविकास आघाडी सरकार करत असल्याने जनतादेखील त्रस्त झाली आहे. त्यामुळे 'काय द्यायचं' याची चर्चा महाविकास आघाडीला सरावाची झाली आहे, पण आता तरी कायद्याचं बोला' सरकार! असं म्हणण्याची वेळ आघाडी सरकारने महाराष्ट्रावर आणलेली आहे, म्हणावं!

शुद्धीपत्र

दिनांक ०६/१२/२०२१ रोजी दैनिक रामप्रहरमध्ये जाहीर केलेल्या जाहीर नोटीसीमधील गाव कोल्ही, तालुका पनवेल व जिल्हा रायगडमधील ॲवॉर्ड क्रमांक KOL-ICOGS-१३३ असा असून सर्व्हे नंबर ५७/९ पुष्पकनगर वडघर आहे. सदर नोटीसीमध्ये भूखंड क्रमांक १४९ असा आहे, परंतु सदरचा भूखंड ४६० असा झाला होता. सबब या शुद्धीपत्राद्वारे असे सूचित करण्यात येते की सदरचा भूखंड क्रमांक हा १४९ असा आहे.

वरील संपादीत जमीन मिळकतीवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरूपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे वा समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
तारीख : २२/१२/२०२१
रायगड

सही/-
ॲड. आशा अरूणकुमार भगत
शॉप ३, प्लॉट ५२,
सेक्टर १०, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड
मो. नं. ८१०८३५५०००

ग्रुप ग्रामपंचायत वडघर

ता. पनवेल, जि. रायगड

जावक क्रमांक : २५३/२/ग्रा.पं. वडघर/२०२१ दिनांक - २२/१२/२०२१

जाहीर निविदा

सर्व नोंदणीकृत ठेकेदार यांस कळविण्यांत येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी नोंदणीकृत ठेकेदारांनी दिनांक-२३/१२/२०२१ ते ३०/१२/२०२१ रोजी दुपारी ०३:०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा ३१/१२/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता उघडणेत येतील त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	लेखाशिर्ष	सन	१% इसारा रक्कम	निविदा फॉर्म मिळण्याची मुदत व वेळ	निविदा फॉर्म स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ	शेरा (निविदा फॉर्म फी)
०१.	वडघर उर्दूशाळा छतातून होणारी पाण्याची गळती थांबविणेसाठी खोल्या बांधणे.	२०४०७३	१४वा वित्त आयोग	२०१७-२०१८	२०४०	२३/१२/२०२१ ते २८/१२/२०२१ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत	३०/१२/२०२१ दुपारी ०३:०० वाजेपर्यंत	२५ रुपये
०२.	कोपर आदिवासीवाडी येथे स्मशानभूमी व शेड बांधणे	२१६०४५	१४वा वित्त आयोग	२०१७-२०१८	२१६०			
०३.	कोपर आदिवासीवाडीअंतर्गत पदपथ रस्ता करणे.	९९०००	१४वा वित्त आयोग	२०१६-२०१७	९९०			
०४.	अंगणवाडी इमारत दुरुस्ती व रंगरंगोटी करणे. वडघर बौद्धवाडा	१७६१७२	१४वा वित्त आयोग	२०१७-२०१८	१७६१			
०५.	शालेय शौचालय बांधणे व दुरुस्ती करणे व शाळा रंगरंगोटी	२६०४३०	१४वा वित्त आयोग	२०१७-२०१८	२६०४			
०६.	कोपर आदिवासी वाडी येथे धोबीघाट व शेड बांधणे.	६००००	१४वा वित्त आयोग	२०१७-२०१८	६००			
०७.	वडघर मोहल्ला अब्बीदीन चौगुले ते नाझ अपार्टमेंटपर्यंत पेव्हरब्लॉक बसविणे.	२०००००	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	२०००			
०८.	वडघर मोहल्ला मेटकरवाडी शौचालय ते मेन रस्त्यापर्यंत पेव्हरब्लॉक टाकणे.	१२८८०२	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	१२८८			
०९.	वडघर बौद्धवाडी सोनावणे घर ते रणयेवले घरापर्यंत गटार बांधणे.	४०००००	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	४०००			
१०.	वडघर मोहल्ला जुन्या शाळेजवळ शेड बांधणे.	२५००००	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	२५००			
११.	वडघर मोहल्ला नावडेकर दुकान ते सिडको मेन गटारपर्यंत पाईप गटार बांधणे.	२०००००	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	२०००			
१२.	कोपर नवीन वस्तीत अंतर्गत नवीन गटार बांधणे.	२९८०००	१५वा वित्त आयोग	२०२०-२०२१	२९८०			
१३.	वडघर मोहल्ला बिलाल पटेल घर ते शब्बीर कल्याणकर गटार दुरुस्ती करणे.	२०००००	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	२०००			
१४.	वडघर मोहल्ला सलीम पेइमाम ते सिडको मेन गटारपर्यंत पाईप गटार बांधणे.	२०४०७०	१५वा वित्त आयोग	२०२१-२०२२	२०४०			
१५.	वडघर बौद्धवाडी स्मशानभूमीची पडलेली भिंत बांधणे.	९००००	१५वा वित्त आयोग	२०२०-२०२१	९००			
१६.	ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे. (चिंचपाडा येथील विठ्ठलवाडी येथील दोन युनिट शौचालय दुरुस्ती करणे.)	३९४४२९	१५वा वित्त आयोग	२०२०-२०२१	३९४४			

अटी/शर्ती

१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल.
२. इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल. (इसारा रक्कम न भरल्यास निविदा अवैध ठरविण्यांत येईल.)
३. निविदा किंमत नापरतावा समजावी.
४. नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५. ठेकेदार नोंदणीकृत (Register) असावा.
६. निविदा मंजूर केल्यास रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
७. ५% टक्के सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८. इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसांनी कामाचा दर्जा पाहून परत मिळेल.
९. वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास व दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रा.पं.ने काम करुन घेतल्यास होणाऱ्या खर्चास जबाबदार राहावे लागेल.
१०. वरील अटी व शर्ती मान्य असणाऱ्यांनीच निविदा भरावी.

सही/-
(श्री. नं. कृ. भगत)
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वडघर

सही/-
(श्री. मुकेश ना. कांबळे)
प्रशासक
ग्रामपंचायत वडघर

निवडक

खारघरमध्ये घरातून लॅपटॉपची चोरी

पनवेल : राहत्या घरातून लॅपटॉपची चोरी झाल्याचा प्रकार खारघर वसाहतीमध्ये घडला आहे. येथील सेक्टर १५ येथे राहणारे तेजस मिरीकर रात्री झोपले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वडिल मॉर्निंग वॉकसाठी घराचा दरवाजा बंद न करता गेले असताना अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून घरातील लॅपटॉप चोरून नेला. याबाबतची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

आपट्यात रक्तदान शिबिरास प्रतिसाद

रसायनी : युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष वृषभ धुमाळ यांच्या वाढदिवसानिमित्त आपटा येथील राधाकृष्ण मंदिरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ५० रक्तदात्यांनी सहभाग घेतला. या वेळी सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व आपटा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदगुरू चॅरिटेबल ट्रस्ट, कोपरखैरणे यांनी या शिबिराचे संयोजक म्हणून काम केले आहे. अध्यक्ष वृषभ धुमाळ यांनी या बद्दल आभार मानले.

पीरवाडी किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम

उरण : पीरवाडी व केगाव-माणकेश्वर सागरी किनारपट्टी भागात मनसेच्या वतीने 'समुद्र किनारा स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. जिल्हा अध्यक्ष अतुल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या तीन तासांच्या सागरी किनारा स्वच्छता मोहिमेत तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी किनाऱ्यावर समुद्रात वाहून आलेल्या बॉटल, प्लास्टिक तसेच इतर तत्सम सुमारे पाच कचरा जमा करण्यात आला. त्यानंतर उरण नगर परिषदेच्या सहकार्याने त्याची योग्य प्रकारे विल्हेवाटही लावण्याची आली. या मोहिमेत रायगड, नवी मुंबईतील अनेक पदाधिकाऱ्यांनीही उपस्थिती दर्शविली.

स्वरांश कोळीला 'भूमिपुत्र सन्मान'

नवी मुंबई : लोकनेते दि. बा. पाटील सांस्कृतिक मंगल कार्यालय, जासई (उरण) येथे दि. बा. पाटील महोत्सव २०२१ च्या निमित्ताने एकविरा कला संस्था आणि तेजस पाटील आयोजित 'भूमिपुत्र सन्मान' पुरस्कार सोहळा रविवारी पार पडला. या वेळी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या २२ जणांना भूमिपुत्र सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये बेलापुरच्या मास्टरमाईंड स्वरांश कोळीने वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी 'भूमिपुत्र सन्मान' मिळवल्याने त्याचे सर्वदूर कौतुक होत आहे. स्वरांशने मास्टरमाइंड चॅम्पीयन्शिप स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय पातळीवर अशी दोन वेळा आपल्या विजयाची मोहर उमटवली आहे. एवढ्या कमी वयात त्याने आपल्या बुद्धमत्तेच्या जोरावर स्पर्धा यशस्वी करुन नवी मुंबईचे नाव उंचावले आहे.

'अंनिस'च्या मुखपत्र अंकाचे प्रकाशन

नवी मुंबई : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन रविवारी (दि. १९) सानपाडा येथे करण्यात आले. प्रकाशन महाराष्ट्र अंनिस राज्य प्रधान सचिव सुशिला मुंडे व अशोक अंकुश यांच्या हस्ते करण्यात आले. सुशीला मुंडे यांनी अंधश्रद्धा हा मानवाच्या शोषणाचा मार्ग आहे आहे, असे मत या वेळी व्यक्त केले. समाजाला जागृत करण्याचे काम अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका करते. या वार्षिक अंकात अंधश्रद्धेच्या विविध कंगोऱ्यांचा धांडोळा घेण्यात आला आहे. महिला या भावनिक असल्याने अंधश्रद्धेला चटकन कशा बळी पडतात याचे विस्तृत विवेचन अंकात आले आहे. अशोक अंकुश यांनी या प्रबोधनपर अंकाची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन केले. हा अंक समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचवण्याचा संकल्प करण्यात आला. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी चमत्कार सादरीकरण केले व त्यामागील विज्ञान, तंत्र व हातचलाखी उलगडून सांगितली याला सुद्धा उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला जे. डी. गवई, किरण वाळुंज, किरण जोशी, कुमार भिवगडे व रघुनाथ काबळे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

वाहतूक नियम पाळा, कारवाई टाळा!

- पनवेलमध्ये रिक्षाचालकांना आवाहन
- नियम मोडणाऱ्या २६५ चालकांना दंड

पनवेल : वार्ताहर

पनवेलमध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६५ रिक्षावाहनांवर वाहतूक विभागाच्या विशेष मोहीमेद्वारे कारवाईची मोहीम राबविण्यात आली. दरम्यान, अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असल्याचे व रिक्षाचालकांनी सतर्क राहून वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन पनवेल वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे.

नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विना गणवेश, विना बॅच, पुढील सीटवर प्रवासी बसवणे याप्रमाणे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाया करण्यात आल्या. एका बैठकीत कारवाईची पूर्व सूचना देऊनही बहुतांश रिक्षाचालकांकडून नियमांचे पालन केले जात नसल्याने २६५ रिक्षाचालकांना वाहतूक विभागाच्या कारवाईस सामोरे जावे लागले.

काही दिवसांपूर्वी पनवेल परिसरातील रिक्षा संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड व वाहतूक शाखेच्या वतीने घेण्यात आली होती. या वेळी सर्व रिक्षाचालकांना इन्शुरन्स, पीयूसी, गणवेश, लायसन्स यासह बॅच नेहमी सहज दिसेल असे लावावे आणि सर्व रिक्षाचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, अशा विविध सूचना देण्यात आल्या होत्या. तरीदेखील काही रिक्षाचालक अजूनही नियमांचे उल्लंघन करत असल्याचे वाहतूक विभागाच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने एकूण २६५ रिक्षांना वाहतूक विभागाच्या कारवायांना सामोरे जावे लागले.

◆ आरटीओच्या दंडाच्या रक्कमेतही झाली वाढ

रिक्षाचालकांनी वाहतुकीच्या सर्व नियमांचे पालन करावे. गाडीचे पेपर वेळेत पूर्ण करून घ्यावेत. व्यसन करून कधीही वाहन चालवू नका. आरटीओच्या दंडाच्या रक्कमेदेखील भरमसाठ वाढ झालेली आहे. त्यामुळे रिक्षाचालकांना भूर्दंड बसू नये याउद्देशाने रिक्षाचालकांना आवाहन करण्यात येते की, यापुढेही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असून रिक्षाचालकांनी सतर्क राहावे आणि नियमांचे पालन करून वाहतूक विभागालाही सहकार्य करावे, असे पनवेल शहर वाहतूक पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी सांगितले.

आरटीओ दंडात भरमसाठ वाढ झाल्याची माहिती देऊन प्रवाशांशी सौजन्याने वागा, मीटरप्रमाणे भाडे घ्या, रिक्षा पासिंग,

रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव मंजूर केल्याने नगरसेवक विक्रांत पाटील यांनी मानले आभार

पनवेल : वार्ताहर

पनवेल शहरातील स्वामी नित्यानंद मार्गाच्या कामासंदर्भातील प्रस्ताव पनवेल महापालिका महासभेत मंजूर झाला आहे. नगरसेवक विक्रांत पाटील यांनी हा विषय त्वरित मार्गी लागण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. हा विषय मार्गी लावल्याने विक्रांत पाटील यांनी पनवेल महापालिकेचे आभार मानले आहेत.

गार्डन हॉटेल ते महानगरपालिका कार्यालय या स्वामी नित्यानंद मार्गाचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले होते, परंतु बाजूला करावयाचे पावसाळी पाण्याचे गटार आणि युटिलिटी डक्ट याचे काम अपूर्ण राहिले होते. यासाठी लागणारे जमीन अधिग्रहण अपूर्ण असल्याने या कामात अडथळा आला होता आणि काम प्रलंबित होते. नागरिकांना यामुळे प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत होते. या विषयाला गांभीर्याने घेत नगरसेवक विक्रांत पाटील यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत हा विषय त्वरित मार्गी लागण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे आग्रह धरला होता. रस्त्यासाठी आधी जागा अधिग्रहण न केल्यामुळे फक्त रस्त्याचे काम पूर्ण झाले, परंतु फुटपाथ आणि स्ट्रॉम वॉटर ड्रेनचे काम पूर्ण झाले नाही. नगरसेवक विक्रांत पाटील व नगरसेवक नितीन पाटील यांनी नागरिकांच्या भावना समजून घेत हा विषय मार्गी लागण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला होता. अखेर महापालिकेच्या महासभेत हा विषय पटलावर घेऊन या कामाला मंजुरी देण्यात आली आहे.

या विषयी सभागृहात बोलताना विक्रांत पाटील यांनी सांगितले की, या कामासाठी कोणतीही वाढीव मुदत न देता केवळ ठरलेल्या वेळेतच काम पूर्ण करेल असा कंत्राटदार नेमावा व आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून हे काम पूर्ण करून घ्यावे. यासोबत जमीन अधिग्रहण प्रक्रिया ही सोप्या पद्धतीने करावी व या अधिग्रहण विषयाचा नागरिकांना मोबदला काय देणार हे ही त्वरित स्पष्ट करावे. हा विषय मार्गी लावल्याने विक्रांत पाटील यांनी पनवेल महापालिकेचे आभार मानले आहेत.

सुकापूरमध्ये महिलेचे दागिने पळविले

पनवेल : महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून एक व्यक्ती पसार झाल्याची घटना सुकापूर परिसरात घडली आहे. सुकापूर शिवनगर येथे राहणाऱ्या जेनसी पॉलराज या शिवण क्लास आटपून घरी जात होत्या. या वेळी हायवेच्या बाजूच्या कच्च्या रस्त्यावर एका अज्ञात व्यक्तीने त्यांना थांबवून विजय पाटील कुठे राहतो, असे विचारुन बोलण्यात गुंतवून ठेवले. यादरम्यान त्याने जेनसी यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून तेथून पळ काढला. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पनवेल परिसरात घरफोडी करणाऱ्या दोघांना अटक

पनवेल : वार्ताहर

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुरु गोविंद वाघे (वय ३५, वलप, आदिवासीवाडी) आणि शरद घनश्याम साहू (वय ४०, रा. गणेशनगर, मुळगाव ओडिसा) अशी आरोपींची नावे आहेत.

वलप येथील अजिंक्य बॅटरी फार्म येथे पत्र्यावरून चोरटे चढले. आणि त्यांनी तेथील शिसाच्या प्लेट, चांदीची मूर्ती, दोन मोबाइल आणि टीव्ही असा एक लाख ३७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. पोलिसांनी सीसीटीव्ही व गुप्त बातमीदार यांच्यामार्फत आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. या वेळी बाबा ढाबा, हेदुटने फाटा येथे दोघांना अटक केली.

वलप येथील अजिंक्य बॅटरी फार्ममधील एक लाख ३७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तर केळवणे गावात शरद साहू याने केलेल्या चोरीत ११ हजार ५०० रुपयांचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. तर तिसऱ्या गुन्ह्यात कसळखंड येथील चोरीमध्ये शरद साहू आणि अन्य एका आरोपीचा समावेश आहे. या गुन्ह्यांमध्ये १३ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तिसऱ्या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी फरार आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

नवीन पनवेलमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त

मोरे हेल्थकेअर आणि शिवतेज मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नवीन पनवेल येथे रविवारी (दि. १९) नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नवीन पनवेल सेक्टर १४ येथील शिवतेज वृत्तपत्र वाचनालयात झालेल्या या आरोग्य शिबिरास चांगला प्रतिसाद लाभला. उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिवतेज मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील, कार्याध्यक्ष प्रेम कांबळे, सचिव नितीन रेवाळे, सांस्कृतिक अध्यक्ष समीर रेवाळे, प्रसिध्दीप्रमुख अक्षय वर्तक, मोरे हेल्थ केअरचे प्रशासकीय अधिकारी अनिल मखामले, नर्सिंग कर्मचारी संघमित्रा हिवाळे, तसेच शिवतेजचे जेष्ठ कार्यकर्ते प्रफुल्ल केणी, कांतीलाल पाटील, संदेश पाटील, समीर शेणवईकर, चेतन मांजरेकर, सुमित कांबळे, प्रणित कांबळे, प्रथमेश रेवाळे, सुदेश पाटील, महिला मंडळाच्या सुनंदा पाटील, सुनिता पाटील, सुवर्णा पाटील, स्वाती रेवाळे, विमल पाटील, अनुष्का मांजरेकर, सुप्रिया कोळी, पार्वती खोत, ममता महाजन, जान्हवी रेवाळे, रिया कुळ्ये, प्रिया महाजन, मानसी आमरे आदींनी मेहनत घेतली.

रसायनी परिसरात स्वच्छता अभियान

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचा उपक्रम

मोहोपाडा : प्रतिनिधी

रोटरी क्लब पाताळगंगा तर्फे एमआयडीसी टेकडीवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. प्लास्टिक पिशव्या, काचेच्या बाटल्या कचरा गोळा करण्यात आला.

पर्यावरण डायरेक्टर सुनील भोसले यांच्या संकल्पनेतून व सर्विस डायरेक्टर वर्षा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रोजेक्ट राबवण्यात आला. आपल्या सर्व आजूबाजूच्या परिसरात एमआयडीसी टेकडीवरील जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी पुरवठा केला जातो, पण तोच परिसर काही लोकांमुळे अस्वच्छ राहणे फार दुर्दैवी गोष्ट आहे, अशी खंत रोटरी क्लबचे अध्यक्ष गणेश काळे यांनी व्यक्त केली. यापुढे असे घडू नये व टेकडी परिसर स्वच्छ ठेवण्याचे साईन बोर्ड लावण्यात आले.

या उपक्रमासाठी अध्यक्ष गणेश काळे, सेक्रेटरी संदीप साबळे, सहाय्यक सेक्रेटरी देवेंद्र महिंद्रकर, ऋतुजा भोसले, होनावळे, राजू गायकवाड, गणेश म्हात्रे, अनूराधा होनावळे, शर्विन भोसले यांची उपस्थिती लाभली. एमआयडीसी अभियंता रामाकृष्ण एम राजू व कर्मचारी यांचे योग्य सहकार्य मिळाले. विषेश सहकार्य विजय पाटील यांचे लाभले.

रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा यांच्यावतीने रसायनी परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी रोटरी क्लब नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

खारघरमध्ये आढळल्या फुलपाखरांच्या ४८ प्रजाती

खारघर : प्रतिनिधी

खारघर शहर हे नवी मुंबई मधील निसर्ग विविधतेने नटलेले अस शहर आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, विस्तीर्ण खाडीकिनारा लाभलेल्या या शहरात झपाट्याने विकास होत आहे, मात्र नैसर्गिक विविधतेने नटलेल्या या शहराचा आणखी एक रूप एका निसर्गप्रेमी छायाचित्रकाराने समोर आणला आहे. मागील तीन वर्षांपासुन केलेल्या छायाचित्रणात खारघरमध्ये ४८ प्रजातीचे वेगवेगळे फुलपाखरू छायाचित्रकार सारंग तरीन यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहेत.

या ४८ फुलपाखरूंपैकी चार जमाती या दुर्मीळ असल्याचे सारंग ने पुढे केलेल्या संशोधनात समोर आले आहे. या दुर्मीळ जमातीमध्ये सह्याद्री प्लेन पफीन व सह्याद्री ब्लु ओकली या केवळ महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वतरंगामध्ये आढळणाऱ्या फुलपाखरांच्या जमाती आहेत. उर्वरित दोन ग्राम ब्लु व ड्यानियड एक्सले या दोन जमाती देशभरात विविध ठिकाणी आढळत असतात या चार पुलाखारांच्या प्रजातींना १९७२ च्या वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार या चारही प्रजातींना संरक्षण प्राप्त आहे. सारीन यांनी टिपलेले हे छायाचित्र खारघर हिल (पर्वतरांगा), खारघर खाडी किनारे, तसेच शहरातील मैदानी ठिकाणावरील आहेत. यामध्ये सेंट्रल पार्क, वेटलँड परिसरातील आहेत. विशेष म्हणजे शहरातील अंतर्गत मैदाने, उद्याने याठिकाणीदेखील फुलपाखरू आढळत आहेत.

खारघर शहराचा झपाट्याने विकास होत चालल्याने मोठ्या प्रमाणात याठिकाणचा निसर्ग नष्ट होत चालला असल्याची खंत निसर्गमित्र छायाचित्रकार सारंग तारीन यांनी व्यक्त केली आहे. वनविभागाने याबाबत गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत तारीन यांनी व्यक्त केली आहे.

खारघरमध्ये आढळलेल्या ४८ प्रजातींचे छायाचित्र सारंग तारीन यांनी https://www.ifoundbutterflies.org/ या संकेतस्थळावर अपलोड केले आहेत. देशभरातीत दुर्मीळ, अतिदुर्मीळ फुलपाखरूचे छायाचित्र या संकेतस्थळावर पहावयास मिळतात.

प्रवासी संघाचे उपाध्यक्ष यशवंत ठाकरेंचे अभीष्टचिंतन

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेल प्रवासी संघाचे उपाध्यक्ष यशवंत ठाकरे यांनी मंगळवारी (दि. २१) ९० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्या निमित्ताने प्रवासी संघाच्या पदाधिकारी, कार्यकारीणी सदस्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभिष्टचिंतन करून त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रवासी संघाचे अध्यक्ष आयुरवेदाचार्य डॉ. भक्तिकुमार दवे, कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत बापट, सदस्य गौतम अग्रवाल, निलेश जोशी, महेश बेलापूरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. दवे व श्रीकांत बापट म्हणाले की, आमच्या सर्वांपेक्षा वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असलेले यशवंतराव ठाकरे हे प्रवासी संघाचे भूषण आहेत, त्यांचा अनुभव, संपन्न अशी कार्यक्षमता, फारच चांगली व उत्कृष्ठ आहे. त्यांनी रोटरी, लायन्स, जेष्ठ नागरीक संघटना-अध्यक्ष, ज्येष्ठ नागरीक संघ-संस्था महाराष्ट्र कोकण

विभाग-उपाध्यक्ष, न्यु.पनवेल प्लॉट ओनर्स वेलफेअर असो, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरीक संघ-चिफ पॅट्रन ई.सेवा भावी संस्थाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार अशी कार्यकारीणीमधील उच्चे पदे भुषविली आहेत व त्या संस्थाची नावेही उज्वल केली आहेत. सद्यस्थितीत ते प्रवासी संघ पनवेलचे उपाध्यक्ष व पनवेल रेल्वे स्थानक सल्लागार समितीचे सदस्यही आहेत.

सत्काराला उत्तर देताना यशवंत ठाकरे म्हणाले की, मी एक समाधानी व्यक्ती आहे व काही करावयाचे राहून गेले आहे, असे मला आता वाटत नाही. मी मरणोत्तर देहदान व नेत्रदानचा संकल्प केला आहे.

संपादकीय

रोकशाही आणि रोखशाही

विधिमंडळाचे अधिवेशन कमीत कमी दिवसांत गुंडाळण्याचा जागतिक विक्रम बहुदा महाविकास आघाडी सरकारच्याच नावावर नोंदवला जाईल असे दिसते. गेल्या दोन वर्षांत या सरकारने विधिमंडळाचे कामकाज केवळ उपचारापुरते उरकले. आता आणखी एकदा कोरोना आणि कोरोनाचा नवा अवतार ओमायक्रॉन यांचा बागुलबुवा पुढे करून मविआ सरकारने अधिवेशन आठवड्याभरात गुंडाळण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोना नियमावलीच्या आडून विधिमंडळात फारशी चर्चाच होऊ द्यायची नाही असा या सरकारचा डाव आहे. अर्थात, तो हाणून पाडण्याचा निर्धार विरोधी पक्षनेत्यांनी व्यक्त केला आहे.

गेली पावणे दोन वर्षे जगभरात कोरोनाचे संकट घोंघावत आहे. या घातक विषाणूने मानवाच्या पुढ्यात काय वाढून ठेवले आहे याची प्रारंभी कुणालाच कल्पना नव्हती, परंतु आता दोन वर्षांमध्ये या महासाथीचे अनेक अनुभव सर्वांनीच घेतले आहेत आणि कोरोनाचा नायनाट करणाऱ्या प्रतिबंधक लसीच्या मात्रादेखील बहुसंख्य नागरिकांना मिळाल्या आहेत. अर्थव्यवस्थेचे गाडे वेगाने दौडू लागले असून बहुसंख्य नागरिक कोरोनापूर्व काळाप्रमाणे रोजीरोटीच्या विवंचनेत बुडाले आहेत. सध्याच्या परिस्थितीत विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन प्रथेप्रमाणे नागपूर येथे पार पडले असते तर काही बिघडणार नव्हते, पण विधिमंडळाचे अधिवेशन बुधवारपासून मुंबईत सुरू होत आहे. त्यासाठी मविआ सरकारने यंदा प्रथमच विरोधकांना चहापानाचे निमंत्रण दिले होते. अर्थात, कुठल्याच मुद्द्यावर गांभीर्यपूर्वक विचार करणे सोडून दिलेल्या आघाडी सरकारच्या या निमंत्रणाला विरोधी पक्षाने धुडकावून लावले. या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडले आहे. हे सरकार कोणत्याच मुद्द्यावर संवेदनशील नाही किंबहुना सरकार आहे असे जाणवतच नाही, अशी जहरी टीका करत विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकत असल्याचे स्पष्ट केले. त्यांची टीका किती अचूक होती याचे प्रत्यंतर लागलीच आले, कारण निमंत्रण देणारे मुख्यमंत्री स्वत:च चहापानाकडे फिरकले नाहीत. या हिवाळी अधिवेशनामध्ये विरोधी पक्ष ठाकरे सरकारला आठ प्रमुख मुद्द्यांवरून घेरणार आहे असे दिसते. लोकशाहीला कुलूपबंद करण्यासाठी जमतील तितके प्रयत्न केले जात आहेत. या सरकारने लोकशाही पूर्णपणे बंद केली असून सध्या महाराष्ट्रात रोकशाही आणि रोखशाही सुरू आहे, असे फडणवीस म्हणाले. त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेची भावनाच बोलून दाखवली असे म्हणावे लागेल. ओबीसी आरक्षण, सुलतानी पद्धतीने शेतकऱ्यांच्या कापलेल्या वीजजोडण्या, पेट्रोल-डिझेलचे न घटवलेले कर, कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा, सध्या राज्यात गाजत असलेला परीक्षा घोटाळा, कुलपती आणि कुलगुरूंच्या अधिकारांतील कपात आणि कोरोना काळातील भ्रष्टाचार अशा विविध मुद्द्यांवर येत्या अधिवेशनामध्ये विरोधी पक्ष सरकारला धारेवर धरणार आहे. फडणवीस यांची तोफ विधिमंडळात धडाडू लागली की सत्ताधाऱ्यांची कशी पाचावर धारण बसते हे गेल्या अधिवेशनामध्ये महाराष्ट्राच्या जनतेने पाहिलेच आहे. मनसुख हिरेन हत्या प्रकरण असो किंवा सचिन वाझे याला पाठीशी घालण्याचा खटाटोप असो, माजी पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांचा फोन टॅपिंग संदर्भातील गोपनीय अहवाल असो किंवा कोविड केंद्रातील अफाट भ्रष्टाचार असो, फडणवीस यांनी मूळ कागदपत्रे सादर करत सत्ताधाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवले होते. फडणवीस यांनी त्या वेळी केलेल्या आरोपांना मविआ सरकारकडे तेव्हा उत्तर नव्हते, आजही नाही. आठवडाभराच्या अधिवेशनामध्ये या वेळीदेखील फडणवीस यांचे आक्रमक स्वरुप बघायला मिळेल आणि ठाकरे सरकारच्या रोखशाहीचा रोखठोक हिशेब घेतला जाईल.

गणपतीपुळे मंदिराचा इतिहास व पर्यटन माहिती

गणपतीपुळे कोकणामधील सर्वांत प्रसिद्ध पर्यटन स्थळ असून गणपतीपुळेचा समुद्रकिनारा महाराष्ट्रातील सर्वात जास्त भेट दिला जाणारा समुद्रकिनारा म्हणून ओळखला जातो. कारण इथे देवदर्शना बरोबरच पर्यटन ही करता येते.

रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे हे तीर्थक्षेत्र म्हणूनही प्रसिद्ध असून सुमारे ४०० वर्षे जुने गणेश मंदिर ही इथली ओळख आहे. पेशवेकालीन स्वयंभू गणेश मंदिरात दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.

दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही वेळ स्वतः साठी देण्यासाठी गणपतीपुळे हे आदर्श स्थळ मानले जाते. इथले स्वच्छ व सुंदर किनारे निसर्गप्रेमींना आकर्षित करतात. देवदर्शनाबरोबरच समुद्रस्नानाचा आनंद इथे घेता येतो.

मंदिराचा इतिहास

सर्व देवतांमधील आद्यदेवता म्हणून गणपती ओळखला जातो. कोणत्याही कार्याच्या आरंभी गणेशाची पूजा केली जाते. अशी ही देवता गणपतीपुळेची मुख्य ओळख आहे. गणपतीपुळे येथील मंदिराचा इतिहास ४०० वर्षे जुना आहे. असे मानले जाते की, गणपती इथे स्वतः प्रकट झाले म्हणून या मंदिराला स्वयंभू गणेश मंदिर म्हणूनही ओळखले जाते. पांढऱ्या दगडामध्ये तयार करण्यात आलेली मूर्ती शेंदरी रंगाने रंगवण्यात आली आहे. दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. गणपतीपुळे गावाच्या नावाचा इतिहासही खूप रंजक आहे. मंदिराच्या उत्तरेला मुख्य गाव असून आता ज्या ठिकाणी मंदिर आहे तिथे पुळण आहे. पुळण म्हणजे समुद्राच्या कडेचा रेतीचा विस्तीर्ण भाग. या पुळणीशेजारी गणपतीचे स्वयंभू मंदिर असल्याने हे स्थान गणपतीपुळे म्हणून ओळखले जाऊ लागले. मंदिराच्या गर्भगृहाच्या बाहेर एक चांदीचा मूषक असून असे मानले जाते की, या मूषकाच्या कानात आपल्या मनातील इच्छा सांगितली असता ती नक्कीच पूर्ण होते.

पाहण्यासारखी ठिकाणे

गणपतीपुळे हे तीर्थक्षेत्र म्हणून जितके प्रसिद्ध आहे, तितकेच ते पर्यटन स्थळ म्हणूनही प्रसिद्ध आहे. सोनेरी रेतीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, उंच उंच नारळाची झाडे, कोकणी पद्धतीची घरे, शांत व निसर्गरम्य वातावरण यामुळे येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी पाहायला मिळते. विशेषतः शनिवार-रविवार व सुट्टीच्या हंगामात गणपतीपुळे पर्यटकांनी गजबजून जाते.

गणपतीपुळे समुद्रकिनारा

गणपतीपुळेच्या बीचवर समुद्रस्नान व उंट, घोडा, एटीवी यांची रपेट, वॉटर स्कूटर, बनाना राईड इत्यादी जलक्रीडांचा आनंद घेता येतो. तसेच जवळच कोकणी संस्कृतीचे दर्शन घडवणारे संग्रहालय असून ते आवर्जून भेट देण्यासारखे आहे.

जयगड किल्ला

गणपतीपुळेच्या उत्तरेला १८ कि.मी. अंतरावर जयगड हा किल्ला असून याची निर्मिती १६ व्या शतकात केली आहे. शास्त्री नदीच्या मुखाजवळ समुद्राला लागून असणाऱ्या उंच टेकडीवरील हा किल्ला सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी महत्वाचा मानला जात होता. या किल्ल्यावरील अवशेषांची पडझड झाली असली तरी तटबंदी, दरवाजा व काही रचना अजूनही सुस्थितीत आहेत. या किल्ल्यावर असणाऱ्या लाईटहाउसला पर्यटक भेट देऊ शकतात. लाईटहाउस वरून समुद्राचे दिसणारे दृश्य विस्मयकारक असते. गणपतीपुळेला येणारे पर्यटक या किल्ल्याला आवर्जून भेट देतात.

निसर्गरम्य व ऐतिहासिक मालगुंड गाव

गणपतीपुळेपासून जवळच मालगुंड हे अगदी कोकणी पद्धतीचे छोटेसे गाव पाहण्यासारखे आहे. प्रसिद्ध मराठी कवी केशवसुत अर्थात कृष्णाजी केशव दामले यांचे जन्मगाव मालगुंड हे असून त्यांच्या राहत्या घरी केशवसुत स्मारकाची उभारणी करण्यात आली आहे. इथे अनेक प्रसिद्ध मराठी कविता सजवल्या आहेत. तसेच केशवसुत याच्या वापरातील वस्तू व १०० वर्षापूर्वीच्या कोकणी घरात वापरल्या जाणाऱ्या वस्तू पर्यटकांना पाहता येतात.

आरे-वारे बीच

गणपतीपुळेपासून दक्षिणेला काही अंतरावर प्रसिद्ध असा आरे-वारे चा विस्तीर्ण समुद्रकिनारा आहे. उंच टेकडीवरून या बीचचे दिसणारे दृश्य अवर्णनीय असते. गर्दी नसणारा हा समुद्रकिनारा पर्यटकांना खुणावत असतो. अनेक पर्यटक इथे निवांत वेळ घालवणे पसंत करतात.

जयगणेश मंदिर गणपतीपुळे

जयगणेश मंदिर हे गणपतीपुळेपासून जवळच जिंदाल उद्योग समूहाने गड्थ च्या योगदानाने निर्माण केलेले गणपतीचे मंदिर प्रेक्षणीय असून याची निर्मिती २००३ साली करण्यात आली आहे.

या मंदिराचा संपूर्ण परिसर सुंदर सुंदर फुलांनी व शोभेच्या झाडांनी वेढलेला आहे. शांत वातावरणात निसर्गसौंदर्याने नटलेले हे मंदिर गणपतीपुळेच्या भेटीवेळी आवर्जून बघण्यासारखे आहे.

गणपतीपुळेला भेट देण्यासाठी सर्वांत चांगला कालावधी

तसे पाहिले तर पर्यटक वर्षभर गणपतीपुळेला भेट देतात. परंतु गणपतीपुळे पर्यटनासाठी सर्वात योग्य कालावधी नोव्हेंबर ते मार्च हा आहे. या काळात गणपतीपुळे येथील हवामान आल्हाददायी असते. आकाश साफ असते व समुद्र शांत असतो. एप्रिल ते मे या काळात तापमान व आर्द्रता जास्त असते. तर जून ते सप्टेबर या काळात मोसमी पाऊस असतो.

गणपतीपुळेमध्ये राहण्याच्या सोयी

तुम्ही जर गणपतीपुळेमध्ये मुक्काम करणार असाल? तर तुम्हाला सांगतो की, गणपतीपुळेमध्ये मंदिराजवळ अनेक लो बजेट ते हाय बजेट हॉटेल्स उपलब्ध आहेत. तसेच कोकणी लोकांचे आदरातिथ्य व संस्कृती अनुभवायची असेल तर अनेक न्याहारी व निवास योजनेखालील होम-स्टे गणपतीपुळे येथे आहेत.

तसेच गणपतीपुळे मंदिर संस्थान यांच्यावतीने भाविकांसाठी प्रशस्त भक्तनिवासाची सेवा नाममात्र दरात उपलब्ध केली आहे.

गणपतीपुळेला कसे जाल?

गणपतीपुळे हे महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्र असल्याने महाराष्ट्रातील सर्व शहरातून गणपतीपुळे येथे जाण्यासाठी वाहतुकीच्या सोयी उपलब्ध आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या साध्या व निमआराम बसेस मुंबई, पुणे, औरंगाबाद, सोलापूर, कोल्हापूर, महाबळेश्वर या शहरातून गणपतीपुळेसाठी नियमित सेवा देतात. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शहरातून गणपतीपुळेसाठी बसेस मिळतात.

दऱ्याखोऱ्यात ज्ञानगंगा पोहचवणे कौतुकास्पद -डॉ. अशोक मोडक

पाच्छापूर विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

सुधागड : रामप्रहर वृत्त

शिक्षण देणे ही आता काळाची गरज झाली आहे. दऱ्याखोऱ्यातील बहुजनांच्या मुलांपर्यंत मोफत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवण्याचे काम श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर करीत आहेत. त्यांचे हे काम निश्चित कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार माजी आमदार डॉ. अशोक मोडक यांनी सुधागड तालुक्यातील पाच्छापूर येथे केले.

श्री सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळ पाच्छापूर या संस्थेने सेवा सहयोग फाउंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनेंतर्गत विद्यालयाची नूतन इमारत उभारली आहे. या इमारतीचे उद्घाटन डॉ. अशोक मोडक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी दैववादी नाही तर प्रयत्नवादी बनावे, असे डॉ. मोडक यांनी यावेळी सांगितले. शिक्षणाने माणूस शहाणा होतो.

दुर्गम भागातील शाळांच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थी घडत आहेत, ते शहाणे होत आहेत, असे तहसीलदार दिलीप रायण्णावार म्हणाले.

सेवा सहयोग संस्थेचे शरद गांगल यांनी संस्थेच्या कार्याची व उपक्रमाची माहिती दिली. भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांनी संस्थेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. तर मुख्याध्यापक दीपक माळी यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर यांनी भविष्यात शाळेचे व संस्थेचे असणारे उद्दिष्ट सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या जंगम यांनी केले.

कार्यक्रमास किशोर मोघे, अरुण करमरकर, रविकांत घोसाळकर, पांडुरंग डिघे, राजू हंबर्डे, राजीव करंदीकर, गिरीश तुळपुळे, नितीन शेवाळे, अशोक मेहता, म. स. जाधव यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

खोपोलीत गतिरोधकाच्या मागणीला यश

खोपोली : प्रतिनिधी

शहरातील पोस्ट ऑफिस आणि आनंद शाळा येथे मुंबई-पुणे महामार्गावर ओलांडताना पादचाऱ्यांना द्रविडी प्राणायाम करावे लागत होते. स्थानिकांच्या मागणीनुसार तेथे आयआरबी विभागाने सोमवारी (दि. २०) गतिरोधक बसविले.

खोपोली शहरातील पोस्ट ऑफिस आणि आनंद शाळा या वर्दळीच्या ठिकाणी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व अन्य पादचाऱ्यांना मुंबई-पुणे महामार्ग ओलांडणे धोकादायक झाले होते. येथे महामार्ग ओलांडण्यासाठी नागरिकांना दुरचा वळसा घालावा लागत होता. याबाबत स्थानिकांनी पोस्ट ऑफिस आणि आनंद शाळा येथे गतीरोधक बसविण्याची मागणी केली होती. त्याची दखल घेत आयआरबी विभागाने सोमवारी महामार्गावर गतिरोधक बसविले. त्यामुळे या भागात होणाऱ्या अपघातांना आळा बसेल व महामार्ग ओलांडणाऱ्या नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी प्रतिक्रिया स्थानिक रहिवासी हरीश काळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना माहिती दिली.

(छाया : विनायक माडपे)

पेणमध्ये नो व्हेइकल डे उपक्रमाचा शुभारंभ

पेण : प्रतिनिधी

संत गाडगेबाबा पुण्यतिथीचे औचित्य साधून पेण शहर व तालुक्यामध्ये सोमवारी (दि. २०) नो व्हेइकल डे उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक सहभागी झाले होते. दर महिन्याच्या २० तारखेला नो व्हेइकल डे साजरा करण्याचा संकल्प या वेळी करण्यात आला.

आजकाल माणसांच्या गर्दीबरोबर वाहनांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे प्रदूषणामध्ये भर पडत आहे, शारीरिक व्याधींना माणसं बळी पडत पडत आहेत. तसेच भरधाव वेगाने वाहन चालवून अपघाताचे प्रमाण वाढत आहे. सायकलीमुळे आपलं शरीर निरोगी व सुदृढ राहतं, शरीराचा व्यायाम होतो. चालण्याने हृदयाचे स्नायू मजबूत होतात. पचनशक्ती सुधारते, सकारात्मक ऊर्जा मिळते. एक निरोगी आयुष्य जगणं हे आपल्याच हातात आहे, असे वृक्षमित्र प्रा. उदय मानकवळे यांनी यावेळी सांगितले.

पेणचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, पोलीस उपनिरीक्षक सतीश शिंदे, मोहिनी गोरे, नमिता म्हात्रे, मनोरमा मानकवळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशी शेटे यांनी केले.

(छाया : अनिस मनियार)

कर्जतमध्ये शनिवारी 'नवरा माझा भवरा'

(छाया : विजय मांडे)

कर्जत : प्रतिनिधी

कोरोना महामारीनंतर कर्जतमध्ये प्रथमच 'नवरा माझा भवरा' या नाटकाच्या निमित्ताने नाटकाची घंटा वाजणार आहे.

किरण थिएटर निर्मित, उर्वीजा कलाप्रेमी प्रकाशित 'नवरा माझा भवरा' हे कौटुंबिक विनोदी नाटक शनिवारी (दि. २५) कर्जतमधील रॉयल गार्डनच्या रंगमंचावर सादर होणार आहे, अशी माहिती लेखक, दिग्दर्शक संदीप विचारे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी निर्मिती प्रमुख अजय भानुशाली, कार्यक्रम प्रमुख विकास चित्ते, वैदेही पुरोहित उपस्थित होत्या.

बापू कालिया अर्थात प्रदिप पटवर्धन बऱ्याच वर्षांनी कर्जतमध्ये येणार आहेत. त्यांच्यासह या नाटकात टीव्ही मालिकेतील कलाकारसुद्धा दिसणार आहेत. कोरोनाचे सर्व नियम पाळून हे नाटक सादर करण्यात येणार आहे, असे संदीप विचारे यांनी या वेळी सांगितले.

बेकरे शाळेत रंगावलीतून गणिताच्या आकृत्या

कर्जत : बातमीदार

जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गणित विषयाची गोडी लागावी, गणितातील प्रमेय सोपी व्हावीत यासाठी शासनाच्या निपुण भारत अभियान अंतर्गत भौमितिक आकृतिबंधाच्या आकृत्या रांगोळ्यांमधून सोपी करण्याचा उपक्रम सुरु झाला आहे. कर्जत तालुक्यातील बेकरे गावामधील जिल्हा परिषद शाळेत सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेऊन गणिताच्या आकृत्या काढल्या. या उपक्रमातील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकेदेखील देण्यात आली.

(छाया : संतोष पेरणे)

बेकरे येथील राजिप प्राथमिक शाळेमध्ये गणितीय संबोधावर आधारित रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शाळेतील सहावी आणि सातवीमधील २३ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला होता. मुख्याध्यापक सुरेश चव्हाण यांनी सुरुवातीला या उपक्रमाबद्दल सर्व विद्यार्थ्यांना माहिती दिली होती. तर उपक्रमशील शिक्षक कृष्णा देसाई यांनी या उपक्रमाचे नियोजन केले होते. या स्पर्धेचे परीक्षण शिक्षिका सुनंदा कोकणे आणि योगेश शेळके यांनी केले.

या स्पर्धेत रितिका नंदकुमार शेंडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. भाविका महेश शेंडे आणि आयुष्य प्रकाश कराळे यांना अनुक्रमे दूसरा व तिसरा क्रमांक मिळाला. चौथा क्रमांक तन्मय प्रकाश कराळे आणि प्रांजल पांडुरंग शेंडे यांना विभागून देण्यात आला.

रायगडातील सहा नगरपंचायतींमध्ये भरघोस मतदान

७९ प्रभागांतील २३३ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद

पाली : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील पाली, खालापूर, पोलादपूर, म्हसळा, तळा, माणगाव या सहा नगरपंचायतीच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया मंगळवारी (दि. २१) एक दोन अपवाद वगळता सर्वत्र शांततेत पार पडली. एकूण ७९ प्रभागातील २३३ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात कैद झाले असून, आता १९ जानेवारीला लागणाऱ्या निकालाकडे साऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

जिल्ह्यातील पाली, पोलादपूर, माणगाव, म्हसळा, तळा आणि खालापूर या नगरपंचायत क्षेत्रात मंगळवारी सकाळी मतदान सुरू झाले. थंडी असल्याने सकाळी मतदारांचा तुरळक प्रतिसाद दिसून आला. सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत झालेल्या मतदानाची एकूण टक्केवारी ३३.६६ इतकी होती. संपूर्ण जिल्ह्यात दुपारी ३.३० वाजेपर्यंत ६५ टक्के मतदान झाले होते.

आपापल्या मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी उमेदवारांच्या जीवाची घालमेल होत होती, तर इतर जिल्ह्यात राहणाऱ्या मतदारांना मतदान करण्यासाठी आणण्यात उमेदवारांनी प्रयत्न केल्याचे पहावयास मिळाले.

सर्वत्र मतदान शांततेत पार पडले असून रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकार, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाकडून उत्तम नियोजन तसेच चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

(छाया : धम्मशील सावंत)

पाली :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १३, एकूण उमेदवार ४७, मतदान केंद्रांची संख्या १५, एकूण मतदार ६,४५५ (स्त्री ३,२१३ आणि पुरुष ३,२४२)

खालापूर :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १६, एकूण उमेदवार ४५, मतदान केंद्रांची संख्या १६, एकूण मतदार ४,९६८ (स्त्री २,५२८ आणि पुरुष २,४४०),

तळा :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १२, एकूण उमेदवार ३५, मतदान केंद्रांची संख्या १२, एकूण मतदार ४,१४१ (स्त्री २,०६२ आणि पुरुष २,०७९)

म्हसळा :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १२, एकूण उमेदवार ३७, मतदान केंद्रांची संख्या १२, एकूण मतदार ४,९७८ (स्त्री २,४५६ आणि पुरुष २,५२२),

पोलादपूर :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १३, एकूण उमेदवार ३९, मतदान केंद्रांची संख्या १३, एकूण मतदार ३,६४६ (स्त्री १,९१५ आणि पुरुष १,७३१)

माणगाव :– एकूण प्रभाग १७, निवडणूक होणारे प्रभाग १३, एकूण उमेदवार ३०, मतदान केंद्रांची संख्या १४, एकूण मतदार १०,४५१ (स्त्री ५,१६९ आणि पुरुष ५,२८२)

पालीत शांततेत मतदान

पाली : प्रतिनिधी

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीची मतदान प्रक्रिया मंगळवारी (दि. २१) शांततेत पार पडली. या निवडणुकीत एकूण ४७ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात कैद झाले असून मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला हे १९ जानेवारीला निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

पाली नगरपंचायतीच्या एकूण १७ प्रभागांपैकी १३ प्रभागांची निवडणूक प्रक्रिया मंगळवारी पार पडली. तर चार ओबीसी प्रभागाची निवडणूक १८ जानेवारीला होणार आहे. या निवडणुकीत शेकाप आणि राष्ट्रवादी यांची आघाडी आघाडी असून, शेकापचे सहा तर राष्ट्रवादीचे सात उमेदवार आघाडी तर्फे

निवडणूक लढवित आहेत. शिवसेना, भाजप व आरपीआय हे स्वतंत्रपणे निवडणूक लढवित आहेत. शिवसेने ११, भाजपने १३, तर रिपाइंने एक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविला आहे.

पालीतील १७ प्रभागात एकूण ८५०० मतदार आहेत. या निवडणुकीत प्रथमच मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या युवक युवतींचा उत्साह दांडगा असल्याचे दिसून आले. दिव्यांग बांधव, वृद्ध यांच्या सोयीसाठी मतदान केंद्रांवर व्हीलचेअरची व्यवस्था ठेवण्यात आली होती. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी मतदान केंद्रावर भेट दिली व मतदानकेंद्रावरील व्यवस्थेची पाहणी केली. दुपारी २ वाजेपर्यंत पालीत ५५ टक्के मतदान झाल्याची माहिती उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिली.

दरम्यान, पोलीस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, पालीचे पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

माणगावात मतदान यंत्रात बिघाड

माणगाव : प्रतिनिधी

नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २१) सकाळी ७.३० वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. मात्र पंचायत समितीच्या जुन्या कार्यालयामधील (वार्ड क्र. १५) केंद्रातील मतदान यंत्रात बिघाड झाला. त्याठिकाणी दुसरे यंत्र आणल्यानंतर तब्बल पाऊण तास उशिरा मतदान प्रक्रिया सुरू झाली.

याबाबत माणगाव नगरपंचायत निवडणूक निर्णय अधिकारी प्रशाली जाधव दिघावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, ते यंत्र आहे, त्यामध्ये कधीही काहीही होऊ शकते. त्या केंद्रामध्ये काही वेळात दुसरी मशीन उपलब्ध करून देण्यात

(छाया : सलीम शेख)

आली. तोपर्यंत मतदार त्याठिकाणी उभे होते. दुपारनंतर या मतदान केंद्रावर गर्दीदेखील नव्हती.

दरम्यान, माणगावात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कुठेही अनुचित प्रकार न घडता सायंकाळपर्यंत शांततेत मतदान झाले.

कर्जत भिसेगाव-चारफाटा रस्त्याच्या कामाला पुन्हा सुरुवात

(छाया : सचिन पेरे)

कर्जत : बातमीदार

गणेशोत्सवापूर्वी खोदून ठेवलेल्या कर्जत नगर परिषद हद्दीमधील चारफाटा ते श्रद्धा हॉटेल या रस्त्याच्या कामाला पुन्हा एकदा सुरुवात झाली आहे.

चारफाटा ते श्रद्धा हॉटेल हा रस्ता अरूंद व नादुरुस्त झाला होता. या रस्त्याला अनधिकृत बांधकामांचा विळखा पडला होता. खराब झालेला हा रस्ता चांगला करावा, अशी मागणी सातत्याने होत होती. काही स्थानिक तरुणांनी या रस्त्यासाठी उपोषणही केले होते. कर्जत नगर परिषदेच्या मागणीनंतर या रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व काँक्रिटीकरणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने साडेचार कोटींचा निधी दिला आहे.

या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले आल्यानंतर गणेशोत्सवापूर्वी हा रस्ता वाहतुकीस बंद करून खोदण्यात आला. त्यानंतर तब्बल तीन महिने रस्त्याचे काम सुरु केले नव्हते. परिणामी रस्त्याअभावी स्थानिकांची प्रचंड गैरसोय होत होती. स्थानिकांना आपली वाहने भिसेगावमधून कर्जत-खोपोली रस्त्याने न्यावी लागत होती.

अनेक महिने रखडलेल्या चारफाटा ते श्रद्धा हॉटेल या रस्त्याच्या आरसीसी काँक्रीटीकरणाच्या कामाला आता सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

खालापुरात उत्साहात मतदान

खोपोली : प्रतिनिधी

खालापूर नगरपंचायतीच्या १६ जागांसाठी मंगळवारी मतदान घेण्यात आले. यावेळी मतदारांचा उत्साह मोठ्या प्रमाणात दिसून येत होता. सतरा प्रभाग असलेल्या खालापूर नगरपंचायतीच्या एका प्रभागातील निवडणूक स्थगित आहे.

मंगळवारी सकाळपासून मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्यामुळे मतदानाची टक्केवारी ८४.६६ टक्के झाली.

खालापूरात शेकापने १५ प्रभागात उमेदवार उभे केले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी सोबत लढत असून शिवसेनेने तेरा प्रभागात तर राष्ट्रवादीने पाच प्रभागात उमेदवार उभे केले आहेत. महड प्रभागात राष्ट्रवादी शिवसेनेत बिनसल्यामुळे याठिकाणी दोघे एकमेकांविरोधात लढत आहेत. भाजप आठ ठिकाणी, मनसे पाच तर राष्ट्रीय काँग्रेसचा उमेदवार एका

(छाया : विनायक माडपे)

जागी निवडणूक रिंगणात आहे.

मतदान केंद्रावर सर्वत्र पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. मतदान शांततेत सुरू होते. मात्र वयोवृद्ध, आजारी मतदारांसाठी व्हीलचेअरची सोय नसल्यामुळे नाराजी व्यक्त होत होती.

बोर्ली एसटी स्थानक परिसरातील अतिक्रमणे हटवण्याच्या कामाला वेग

मुरूड : प्रतिनिधी

तालुक्यातील बोर्ली एसटी स्थानक परिसरातील सरकारी जागेवर करण्यात आलेली अतिक्रमणे हटविण्याच्या कामाला वेग आला आहे. त्यासाठी मंगळवारी (दि. २१) बोर्ली मंडल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्तात या जागेची मोजणी करण्यास सुरूवात झाली.

बोर्ली एसटी स्थानक परिसरातील सरकारी जागेवरील अतिक्रमणे तोडण्यात यावीत, अशी मागणी वनिता पाटील यांनी केली होती. याबाबतचा वाद जिल्हा न्यायालयातसुद्धा सुरु होता. परंतु न्यायालयात महसूल खात्याला प्रतिवादी बनवण्यात आले नव्हते. दरम्यान, सदरची जागा शासनाची असल्याने ती शासनाने ताब्यात घ्यावी, असा निर्णय लोकायुक्तांनी दिला. लोकायुक्तांच्या आदेशानुसार महसूल कर्मचाऱ्यांनी मंगळवारी पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण झालेल्या जागेच्या मोजणी करण्यास सुरूवात केली आहे. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमणे तोडण्यात येणार असल्याची माहिती मुरूड तहसील कार्यालयाकडून देण्यात आली.

(छाया : संजय करडे)

खोपोलीतील श्रीराम मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

खोपोली : प्रतिनिधी

नगरपालिका हद्दीतील श्रीरामनगर येथील श्रीराम मंदिरात श्रीराम, लक्ष्मण, सीता, श्री गणपती व श्री हनुमान या देवतांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधी सोहळा संपन्न झाला. १८ ते २० डिसेंबर या कालावधीत हा सोहळा धर्माधिकारी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. काकड आरती, होम, हवन, भजन, हरिपाठ या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मूर्तीची खोपोली शहरातून ते श्रीरामनगरपर्यंत वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली होती, मिरवणुकीत असंख्य भाविकांचा

सहभाग होता.

हा तीन दिवसीय सोहळा यशस्वीतेसाठी श्रीराम मंदिर देवस्थान समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती कोळेकर, सचिव धोडीराम गायकवाड, कोषाध्यक्ष सुरेश म्हापळकर, सदस्य विशाल चव्हाण, बंडू चित्ता, शंकर मोहिते, राजकारण पाल, गणेश पाटील, हरी कुलकर्णी, इंदिरा घावटे, ॲड. अमोल पडवळ, दिलीप शिंदे, विवेक पाटील, दशरथ कटके आदींसह ग्रामस्थांनी प्रयत्न केले. तीन दिवस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, असे दत्ता पाटील यांनी सांगितले.

ॲड. आशा अरुणकुमार भगत

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि. चौ. अर्ज क्र. १७६५/२०२१
निशाणी क्रमांक : ८/ड
ने. ता. १९/०१/२०२२

१. श्रीमती. फातिमा अब्दुल गफुर गार्दी
२. श्री. उजेफा अब्दुल गफुर गार्दी
३. श्री. बिलाल अब्दुल गफुर गार्दी
४. सौ. सुरैया अब्दुल गफुर गार्दी
५. कुमारी सॉलिया अब्दुल गफुर गार्दी
सर्व रा. मौजे तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८

१. सदरहू अर्जदार यांनी सदरचा चौकशी अर्ज वारस दाखला मिळणेकरिता मे. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदरहू अर्जदार क्रमांक १ यांचे पती व क्रमांक २ ते ५ यांचे वडील अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी हे दिनांक १९/०२/२०२१ रोजी मयत झाले. त्यांच्या पश्चात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब मयत अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहू अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी (मयत मूळ पुरुष)
↓
श्रीमती. फातिमा अब्दुल गफुर गार्दी (मूळ मयत पुरुषाची पत्नी)
↓
श्री. उजेफा अब्दुल गफुर गार्दी (मूळ मयत पुरुषाचा मुलगा)
↓
श्री. बिलाल अब्दुल गफुर गार्दी (मूळ मयत पुरुषाचा मुलगा)
↓
सौ. सुरैया अब्दुल गफुर गार्दी (मूळ मयत पुरुषाची मुलगी)
↓
कुमारी सॉलिया अब्दुल गफुर गार्दी (मूळ मयत पुरुषाची मुलगी)

२. सदरहू अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीनी सरकार तर्फे सिडकोने 'नवी मुंबई योजनेकरिता' भूसंपादन केलेल्या आहेत. त्या जमिनींचे वर्णन येणेप्रमाणे :-

जमीन मिळकतींचे वर्णन
मौजे-ओवे, ता. पनवेल, जि. रायगड

युनिट केस क्र.	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
ओवे/११४	८०	१ ब	०-२७-४	२३०.६५

सदरहू भूखंड हा अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी यांच्या नावे मिळालेला होता व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे भूखंड मिळालेला आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच मयत अब्दुल गफुर ईस्माईल गार्दी यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रिक बाबींचा अडथळा येऊ नये ह्या कारणास्तव वरील मयत व्यक्तींचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करून मागत आहेत.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज २१/१२/२०२१ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

सही/-
क. लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

(शिक्का)

सही/-
सह. अधीक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ६५ (ई-निविदा) सन २०२१-२२

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दूरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण १३ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक २२.१२.२०२१ सकाळी १०.०० ते दिनांक ०५.०१.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/४५१५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :- १४/१२/२०२१

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, पनवेल

नोटीस

सिल्व्हर सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादित, पत्ता-बी-२, शिवाजीरोड, पनवेल या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत दुकानगाळा क्र.०२, धारण करणाऱ्या श्री. चंद्रकांत प्रभाकर लिमये यांचे तारीख ०२/०९/२०२१ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीद्वारे/हरकतदार यांच्याकडून हक्क-मागण्या/ हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्ठ्यर्थ आवश्यकत्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्कमागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलाशी, मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीतील एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पाहण्यासाठी संस्थेच्या वरील पत्यावर - सचिव यांचेकडे सकाळी-११ ते दुपारी ३ पर्यंत, नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- २२/१२/२०२१

सही/-
सिल्व्हर सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादित, पनवेल,
यांच्याकरीता आणि वतीने पनवेल
पत्ता : सिटी सर्वे नं. ६८०, ६८१ शिवाजी रोड, पनवेल ४१०२०६

प्रो-कबड्डी लीगचा आजपासून रंगणार थरार

मुंबई : प्रतिनिधी
प्रो-कबड्डी लीग २०२१ स्पर्धा २२ डिसेंबरपासून सुरू होत आहे. कोरोनामुळे गेल्या वर्षी ही लीग होऊ शकली नव्हती. त्यानंतर यंदा ती बंगळुरू येथे खेळली जात आहे. यामध्ये एकूण १२ संघ सहभागी होत असून सामने प्रेक्षकांविना रिकाम्या स्टेडियममध्ये खेळवले जाणार आहेत, परंतु प्रेक्षक टीव्हीवर त्याचा आनंद घेऊ शकतात. प्रो-कबड्डी लीगमध्ये दररोज दोन ते तीन सामने खेळले जातील. तिन्ही सामन्यांची वेळ वेगळी असेल. पहिला सामना संध्याकाळी ७.३० वाजता, दुसरा सामना ८.३० वाजता आणि तिसरा सामना रात्री ९.३० वाजता खेळवला जाईल. पहिल्या दिवशी बंगळुरू बुल्स विरुद्ध यू मुंबा, तेलुगु टायटन्स विरुद्ध तामिळ थलायवास आणि बंगाल वॉरियर्स विरुद्ध यूपी योद्धा यांच्यात तीन सामने होतील. प्रो-कबड्डी लीगचा आठवा हंगाम स्टार स्पोर्ट्स नेटवर्कच्या सर्व चॅनेलवर पाहता येईल. डिस्ने प्लस आणि हॉटस्टार या ॲप्सवरही तुम्ही सामन्यांचे लाइव्ह स्ट्रीमिंग पाहू शकता. ही स्पर्धा २० जानेवारीपर्यंत खेळवली जाणार असून ती रोमांचक होण्याची अपेक्षा आहे. स्पर्धेत प्रत्येक संघात १२ खेळाडू असतात, परंतु सात खेळाडू कोर्टवर खेळतात. पाच खेळाडू सुरक्षित असतात जे विशेष परिस्थितीत वापरले जातात.

ठाणे, पालघरसह परभणीची विजयी सलामी

परभणी : प्रतिनिधी
यजमान परभणीने ३२व्या किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत एकतर्फी विजय मिळविले. किशोर गटात गतविजेत्या ठाण्याला सोलापूरने अखेरपर्यंत झुंजवले, तर किशोरी गटात मुंबई उपनगरला साखळीतील पहिल्याच सामन्यात पालघरकडून पराभवाचा धक्का बसला.

परभणी-पाथरी येथील कबड्डीमहर्षि बुवा साळवी क्रीडा नगरीत खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेत मुलांच्या क गटात परभणीने नांदेडला ५०-०२ असे नमवित आगेकूच केली. मध्यंतरापर्यंत तीन लोण देत परभणीने ३२-०० अशी आघाडी घेतली होती. बबलू घाडगे, अतुल जाधव यांचा झंजावाती खेळ या विजयात महत्त्वाचा ठरला. मुलींच्या ब गटात परभणीने लातूरचा ८१-१४ असा पाडाव करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. दिशा चव्हाण, अलफिया शेख यांचा चतुरस्त्र खेळमुळे हा विजय सोपा झाला.

किशोर-किशोरी राज्य कबड्डी स्पर्धा

मुलांच्या अ गटात गटविजेत्या ठाण्याला सोलापूरने चांगलेच झुंजवले. अखेर ठाण्याने २८-२७ अशी बाजी मारली. मध्यंतराला ठाण्याकडे १२-११ अशी आघाडी होती. शेवटी तीच त्यांच्या कामी आली. शेवटची दोन मिनिटे पुकारली तेव्हा सोलापूरकडे २७-२२ अशी आघाडी होती आणि त्यांचे दोन खेळाडू शिल्लक होते. शेवटच्या क्षणी लोण देत ठाण्याने ही आघाडी कमी करीत २७-२७ अशी बरोबरी साधली आणि वेदांत वाघ यांनी शेवटच्या चढाईत गडी टिपत ठाण्याला विजयी केले. या विजयात त्याला चंद्रप्रकाश चव्हाण, तनीश कदम, विवेक यादव यांचीदेखील मोलाची साथ लाभली. सोलापूरच्या आदित्य नल्ले, प्रदीप गायकवाड यांची कडवी लढत अयशस्वी ठरली.

महिलांच्या ब गटात गतउपविजेत्या मुंबई उपनगरला पहिल्या साखळी सामन्यात पराभवाला सामोरे जावे लागले. पालघरने मुंबई उपनगरला ३८-२६ असे पराभूत करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. मध्यंतरालाच पालघरकडे १९-१० अशी आघाडी होती. या विजयाचे सारे श्रेय ग्रीष्मा वनारसे, हनी प्रसाद यांना जाते. उपनगरची सानिया इंगळे एकाकी लढली.

पंच अरुण पाटकर यांचा गौरव

पनवेल : वार्ताहर
महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने कोल्हापूर येथे जिल्हा असोसिएशन आणि लिफ्टर्स पॉइंट जिम कळंब यांच्या सहयोगाने राज्यस्तरीय सीनिअर पॉवरलिफ्टींग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अरुण पाटकर यांनी उत्कृष्ट पंच म्हणून द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल त्यांना गौरविण्यात आले.

स्पर्धा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त विभिषण पाटील आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सेक्रेटरी शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या स्पर्धेत उत्कृष्ट पंच म्हणून काम करणाऱ्यांना गौरविण्यात आले. यामध्ये रायगडमधील अरुण पाटकर यांचा समावेश होता. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

भारत-पाकिस्तान महामुकाबला रंगणार

आशिया चषक स्पर्धेत २५ डिसेंबरला लढत

नवी दिल्ली : वृत्तसंस्था
यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत टीम इंडियाचा पाकिस्तानकडून दारुण पराभव झाला. आता या पराभवाचा वचपा काढता येऊ शकतो. यूएईमध्ये २३ डिसेंबरपासून अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात २५ डिसेंबरला म्हणजेच ख्रिसमसच्या दिवशी दुबईत टक्कर होणार आहे.

आशियाई क्रिकेट परिषदेने (एसीसी) आयोजित केलेल्या स्पर्धेत आठ संघ सहभागी होत आहेत. ते दोन गटांमध्ये विभागले गेले आहेत. अ गटात भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि यूएई यांना स्थान मिळाले आहे, तर बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका आणि कुवेत हे ब गटात आहेत. प्रत्येक संघाला तीन साखळी सामने खेळायचे असून अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत जातील. म्हणजेच भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ उपांत्य फेरीत गेले, तर पुन्हा एकदा अंतिम फेरीत दोघांमध्ये टक्कर होऊ शकते.

अंडर-१९ आशिया चषक स्पर्धा १९८९मध्ये सुरू झाली. आतापर्यंत एकूण आठ हंगाम सामने खेळले गेले आहेत. विशेष म्हणजे भारताने सात वेळा विजेतेपद पटकावले आहे. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानचे संघ प्रत्येकी एकदा जेतेपद पटकावण्यात यशस्वी ठरले आहेत. २०१२मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात खेळलेला अंतिम सामना बरोबरीत सुटला होता. या कारणास्तव दोघांना संयुक्त विजेता घोषित करण्यात आले. २०१३-१४मध्ये झालेल्या अंतिम फेरीत भारताने पाकिस्तान संघाचा ४० धावांनी पराभव केला होता.

आशिया कपमध्ये भारताचे सामने

२३ डिसेंबर : भारत विरुद्ध यूएई
२५ डिसेंबर : भारत विरुद्ध पाकिस्तान
२७ डिसेंबर : भारत विरुद्ध अफगाणिस्तान
३० डिसेंबर : सेमीफायनल
३१ डिसेंबर : फायनल

भारतीय संघ-हरनूर सिंह पन्नू, अंगक्रिश रघुवंशी, अंश गोसाई, एसके रशीद, यश धुल (कर्णधार), अनेश्वर गौतम, सिद्धार्थ यादव, कौशल तांबे, निशांत सिंधू, दिनेश बाना (विकेटकीपर), आराध्य यादव (विकेटकीपर), राजंगद बावा, राजवर्धन हैंगरगेकर, गर्व सांगवान, रवी कुमार, रिशिथ रेड्डी, मानव पारख, अमृत राज उपाध्याय, विक्की ओस्तवाल.

आरोग्य प्रहर

मधुमेही रुग्णांसाठी 'असे' दूध पिणे भरपूर फायदेशीर

मधुमेह हा असा आजार आहे की तो एकदा कुणाला झाला की तो आयुष्यभर पाठलाग सोडत नाही. याचा त्रास झालेल्या रुग्णांना आयुष्यभर औषधांचा चटका सहन करावा लागतो, पण आहाराची विशेष काळजी घेतल्यास साखरेवर बऱ्याच अंशी नियंत्रण ठेवता येते. चला जाणून घेऊया की, दुधासोबत दोन गोष्टींचे सेवन केल्याने साखरेची पातळी नियंत्रणात ठेवता येते.

दूध हे असे पेय आहे, ज्यामध्ये सर्व प्रकारची पोषक तत्वे आढळतात. हे पेय शरीराला ताकद देण्यास मदत करते. यामध्ये प्रथिने, कॅल्शियम, झिंक, व्हिटॅमिन डी आणि पोटॅशियम मुबलक प्रमाणात असते. तथ्यांनुसार, मधुमेहाच्या रुग्णांसाठी दूध फायदेशीर आहे. संशोधनानुसार, दुधाचा मधुमेहावर संरक्षणात्मक प्रभाव पडतो. या दोन गोष्टी दुधात मिसळल्याने साखर नियंत्रणात राहते.

दालचिनी – दालचिनीचा वापर जेवणाची चव वाढवण्यासाठी केला जातो. यासोबतच साखरेवर नियंत्रण ठेवण्यासही हे उपयुक्त आहे. यामध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात. लोह, पोटॅशियम, जीवनसत्त्वे भरपूर असलेली दालचिनी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. झोपण्यापूर्वी दुधात दालचिनी मिसळून प्या. याचा फायदा तुम्हाला होऊ शकतो.

हळद – हळद मधुमेह नियंत्रणात उपयुक्त आहे. यामध्ये असलेले पोषक तत्व शरीराला अनेक आजारांपासून सुरक्षित ठेवतात. यासोबतच याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्तीही मजबूत होते. हळदीसोबत या गोष्टींचे सेवन रक्तातील साखरेच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते.

गिलॉय स्टिक क्रश करा आणि एका ग्लास पाण्यात टाका. त्यात थोडी हळद आणि आले घालून चांगले उकळा. ते अर्धवट राहिल्यावर गाळून प्या. हे पेय दिवसातून सुमारे दोनदा प्या. यामुळे मधुमेह नियंत्रणात राहील.

आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी असते जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. हळदीसोबत याचे सेवन केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

जर तुम्ही हळदीच्या मुळांचा अर्क घेऊ शकता, तर तुम्ही साखरेची पातळी अगदी सहज नियंत्रित करू शकता.

नदालला कोरोनाची लागण

माद्रिद : वृत्तसंस्था
टेनिसपटू राफेल नदाल याला कोरोनाची लागण झाली आहे. अबुधाबी येथे गेल्या आठवड्यात झालेल्या सामन्यानंतर स्पेनमध्ये परतल्यावर राफेल कोरोनाबाधित आढळला आहे.

राफेल सध्या गृहविलगीकरणात असून त्याच्या संपर्कात आलेल्या सर्वांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तत्पूर्वी या आठवड्यात नदालने शुक्रवारी चार महिन्यांहून अधिक काळानंतर आपला पहिला सामना खेळला. तो अबूधाबी येथे एका स्पर्धेत अँडी मरेकडून सरळ सेटमध्ये पराभूत झाला. २० वेळा ग्रँडस्लॅम चॅम्पियन असलेल्या नदालच्या पायाच्या तीव्र दुखापतीमुळे त्याला या मोसमाच्या शेवटच्या महिन्यांपासून बाहेर बसावे लागले होते.

भारत-आफ्रिका पहिली कसोटी दर्शकांविना?

सेंच्युरियन : वृत्तसंस्था
भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २६ डिसेंबरपासून खेळवला जाणार आहे, मात्र या सामन्यापूर्वीच क्रिकेट चाहत्यांना मोठा झटका बसला आहे. सेंच्युरियन येथे खेळल्या जाणाऱ्या बॉक्सिंग डे कसोटीत प्रेक्षकांना परवानगी दिली जाणार नाही. एका अहवालातून ही बाब समोर आली आहे. अहवालानुसार क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने ओमायक्रॉनचे संकट पाहता तिकिटांची विक्री केलेली नाही.

वृत्तानुसार या सामन्यासाठी काही प्रतिनिधींना मैदानावर जाण्याची परवानगी दिली जाईल.



दक्षिण आफ्रिकेतील कोविड-१९ निर्बंधांमुळे भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट मालिकेदरम्यान दोन हजार प्रेक्षकांना मैदानावर जाण्याची परवानगी देण्यात येणार असल्याची बातमी यापूर्वी आली होती. तेव्हा ओमायक्रॉनच्या प्रकरणात घसरण आली तर दर्शकांची संख्या वाढेल असे सांगण्यात आले.

स्टेडियमच्या ट्विटर हँडलवर माहिती देण्यात आली आहे की, दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यात इम्पीरियल वांडरर्स स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी प्रेक्षक येतील की नाही हे सध्या स्पष्ट नाही. या संदर्भात पुढील घोषणा करण्यात येईल. विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेत पोहचलेल्या भारतीय संघाने पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी येथे सराव सुरू केला आहे. आफ्रिकेला जाण्यापूर्वी टीम इंडियाला मुंबईत क्वारंटाइन करण्यात आले होते.

भारतीय संघ आठव्यांदा दक्षिण आफ्रिकेचा दौरा करीत आहे. जगातील हा एकमेव देश आहे जिथे भारतीय संघ अजूनही कसोटी मालिका जिंकलेला नाही. विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली दुसऱ्यांदा दक्षिण आफ्रिकेत गेलेली टीम इंडिया या वेळी नक्कीच इतिहास रचेल अशी सर्वांना आशा आहे.

पनवेल : भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते शंकुनाथ भोईर (खिडूकपाडा) यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी कुणाल भोईर, उमेश भोईर उपस्थित होते.

राम प्रहर अर्थसाक्षर प्रश्नमंजुषा

आपल्या दैनिक राम प्रहर मध्ये दर रविवारी अर्थ प्रहर सदर प्रकाशित होते. या सदरातून वाचकांना अर्थविषयक माहिती देण्यात येते. ही माहिती 'राम प्रहर'च्या वाचकांसाठी लाभदायक ठरत असते. याच सदरात दर रविवारी आता वाचकांसाठी प्रश्नमंजुषा सुरू करीत आहोत.

'अर्थसाक्षर' या शीर्षकाखाली येत्या रविवारी, दि. २६ डिसेंबर २०२१पासून सुरू होणाऱ्या या प्रश्नमंजुषेमध्ये वाचकांना तीन प्रश्न विचारण्यात येतील. या प्रत्येक प्रश्नासोबत चार पर्यायी उत्तरे दिली जातील. त्यातील योग्य उत्तर वाचकांनी निवडायचे आहे. निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

या तिन्ही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तिन्ही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील. तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com